cmyk

## संपादकीय

### राधाकृष्णन यांना कोंडी फोडावी लागेल

भारताचे पंधरावे उपराष्ट्रपती म्हणून सी पी राधाकृष्णन यांनी नुकतीच शपथ घेतली. केंद्रातील सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीने त्यांना उमेदवारी जाहीर केली तेव्हाच त्यांचा विजय निश्चित होता. उपराष्ट्रपती संसदेचे वरिष्ठ सभागृह राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. या सभागृहाचा कारभार त्यांना चालवायचा असतो. तेथेच या पदावरील व्यक्तीची खरी कसोटी असते आणि त्याला राधाकृष्णन यांनाही सामोरे जावे लागणार आहे.


दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### शेतकऱ्यांऐवजी जातीसाठी लढलो असतो तर लोकांनी डोक्यावर घेतले असते – बच्चू कडू

परभणी: जाती–जातीत भांडण लावून राजकारणी लोकांना अडकवत आहेत, त्यांच्या खेळीला बळी पडू नका असे आवाहन माजी आमदार आणि प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी केले. शेतकऱ्यांसाठी लढून शेतकरी साथ देत नाहीत. त्याऐवजी जर जातीसाठी लढलो असतो तर लोकांनी डोक्यावर घेतले असते, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. परभणीच्या पिंगळी गावात प्रहार संघटनेकडून आयोजित शेतकरी शेतमजूर हक्क परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बच्चू कडू यांनी सध्या राज्यात सुरू असलेल्या जातीकरणावर भाष्य केले. बच्चू कडू म्हणाले की, ''एवढा मोठा अर्थतज्ज्ञ, शेतकऱ्यांसाठी घरावर तुळशीपत्र ठेवून लढणारे शरद जोशी हे ३४ वर्षांच्या गंजटी मुलाकडून पराभूत होतात, का तर फक्त त्यांची जात आडवी आली. बाबासाहेबांना पाडले गेले का तर आमच्या जातीचा माणूस पाहिजे म्हणून. अरे, मी जर जातीसाठी लढा दिला असता तर लोकांनी डोक्यावर घेतले असते.

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१४० | सोमवार, दि.१५ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# शेतकऱ्यांच्या फोन कॉल्स आंदोलनाने लोकप्रतिनिधींना चपराक

## आमदार, खासदार, मंत्र्यांचे फोन खणखणले, कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी उडवली धांदल

नाशिक । प्रतिनिधी

**कांद्याचे कोसळलेले भाव वाढावेत, यासाठी महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेने पुकारलेल्या फोन करो आंदोलनाला शेतकऱ्यांचा जोरदार प्रतिसाद मिळत आहे. महाराष्ट्र भरातून कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे फोन आमदार, खासदार, मंत्र्यांना जात आहेत.**

राज्यातील खासदार, आमदार, विविध मंत्र्यांना शेतकऱ्यांसह शेतकरी संघटनेच्या नेत्यांनी फोन करून कांदाप्रश्नी जाब विचारला. सत्ताधारी ▶▶ पान २ वर



### कृषिमंत्री भरणे यांचे आश्वासन

कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याशी एक, दोन शेतकऱ्यांचा संपर्क झाल्याचे संघटनेच्या मुख्य पदाधिकाऱ्यांनी सांगितले. यात भरणे यांनी कांद्याला जास्तीत जास्त भाव मिळण्यासाठी राज्याचे शिष्टमंडळ लवकरच पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांची भेट घेणार असल्याचे आश्वासन दिले.

### या मंत्र्यांशी केला संपर्क

पणन मंत्री जयकुमार रावल, महसुलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, राज कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, मंत्री जयकुमार रावल, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ, खासदार नीलेश लंके (अहिल्यानगर), खासदार भास्कर भगरे (दिंडोरी), संदीपानराव भुमरे (छत्रपती संभाजीनगर), राजाभाऊ वाजे (नाशिक), गोवाल पाडवी (नंदुरबार), ओमराजे निंबाळकर आदींशी शेतकऱ्यांचा संपर्क झाला.

## थोडक्यात...

### आयटीआयमध्ये १.२५ लाखांवर प्रवेश!

मुंबई : कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने शासकीय व खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (आयटीआय) प्रवेशासाठी आणखी एक संधी दिली आहे. तब्बल सहा फेरीत आतापर्यंत १ लाख २५ हजार ८२० विद्यार्थ्यांनी प्रवेश विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. आयटीआय प्रवेशासाठी दिलेल्या मुदतीत प्रवेश अर्ज सादर करू न शकलेल्यांना या महिनाअखेरपर्यंत म्हणजेच ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज करुन प्रवेश घेता येणार आहे. राज्यातील खासगी आणि शासकीय अशा १ हजार आयटीआयमध्ये विविध ट्रेड्ससाठी प्रवेश प्रक्रियेच्या सहा कॅप फेर्या आतापर्यंत पार पडल्या. या सहा फेर्यांमधून आतापर्यंत १ लाख २५ हजार ८२० विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले. यामध्ये १ लाख ४ हजार २०० मुले व २१ हजार ६१९ मुली सहभागी झाल्या.

### आणखी एक कबुतरखाना, लोढांच्या हस्ते उद्घाटन

मुंबई: कबुतराखान्यांची राजधानी असलेल्या मुबईत आणखी एका कबुतरखान्याची भर पडली आहे. राज्याचे मंत्री मंगलप्रभात लोढांनी रविवारी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील तीन मूर्ती जैन मंदिर येथे नव्या कबूतरखान्याचे उद्घाटन केले. त्यामुळे मुंबईतील कबुतरखान्यांची संख्या आता ५२ इतकी झाली आहे. मुंबईतील प्रत्येक वॉर्डमध्ये कबुतरखाना उभारला जावा, अशी इच्छाही यावेळी लोढांनी व्यक्त केली. मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले की, नॅशनल पार्कमध्ये सर्व प्राणी वावर करत आहेत. तसेच पक्षी पण वावर करत आहेत. माझी अपेक्षा आहे की प्रत्येक वॉर्डमध्ये अधिकृत कबुतरखाने उभे करू. प्रत्येक ॲडमिनिस्ट्रेशन वॉर्डमध्ये हे कबुतरखाना उभारावेत. मुंबईमध्ये हा प्रॉब्लेम होता म्हणून आपण इथे सुरुवात केली आहे.

### सीबीआयची नाशिक–कल्याणमध्ये मोठी कारवाई!

नाशिक : महाराष्ट्रातील नाशिक आणि कल्याण येथे सीबीआयने मोठी कारवाई करत बेकायदेशीर कॉल सेंटरचा पर्दाफाश केला आहे. या कॉल सेंटरमधून परदेशी नागरिकांना विमा एजंट म्हणून खोटे सादरीकरण करत लाखो रुपयांची फसवणूक केली जात होती, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे. सीबीआयच्या माहितीनुसार, हे कॉल सेंटर परदेशी नागरिकांशी संपर्क साधून त्यांना फसवण्याचे काम करत होते. यासाठी ६० जणांची टीम कार्यरत होती, जी प्रशिक्षित पद्धतीने लोकांना खोट्या ऑफर्सद्वारे फसवत होती. या कारवाईत सीबीआयने ५ लाख रुपये रोख, मोबाईल फोन, संगणक, लॅपटॉप आणि इतर डिजिटल उपकरणे जप्त केली आहेत. या उपकरणांमधून आणखी महत्त्वपूर्ण माहिती मिळण्याची शक्यता आहे.

### सुशीला कार्की यांच्याकडून आंदोलकांच्या मागण्या मान्य

काठमांडू : नेपाळच्या नवीन नेत्याने रविवारी (१४ सप्टेंबर २०२५) अंतरिम पंतप्रधान म्हणून काम सुरू करताना ''भ्रष्टाचार संपवण्याच्या'' निदर्शकांच्या मागण्यांचे पालन करण्याचे वचन दिले. ''जनरल झेड'' युवा निदर्शनांनी त्यांच्या पूर्वसुरींना पदच्युत केल्यानंतर, त्यांनी अंतरिम पंतप्रधान म्हणून काम सुरू केले. ७३ वर्षीय माजी मुख्य न्यायाधीश सुशीला कार्की यांना सुव्यवस्था स्थापित करण्याचे आणि सहा महिन्यांत निवडणुका होण्यापूर्वी भ्रष्टाचारमुक्त भविष्यासाठी निदर्शकांच्या मागण्यांचे निराकरण करण्याचे काम सोपवण्यात आले आहे. आपल्याला जनरेशन झेड पिढीच्या विचारसरणीनुसार काम करावे लागेल,असे शुक्रवारी स्वीकारल्यानंतर पंतप्रधान सुशीला कार्की यांनी त्यांच्या पहिल्याच सार्वजनिक भाषणात म्हटले आहे.

# लक्षात ठेवा 'आमच्या लेकी-बाळीपर्यंत तुमची नजर चाललीय !

## लक्ष्मण हाकेंचा जरांगे यांनी घेतला खरपूस समाचार

जालना । प्रतिनिधी

**आरक्षणाबद्दल बोलत होता, तुम्ही वैचारिक विरोध करत होता, तोपर्यंत ठीक होतं. परंतु आता तुम्ही आमच्या अस्मितेपर्यंत पोहोचला आहात, आमच्या लेकी बाळीपर्यंत तुमची नजर चालली, त्यामुळे तुम्ही कोणत्या विचाराचे माणूस आहात? हे आम्हाला कळाले आहे, असा लक्ष्मण हाके यांच्या त्या वक्तव्याचा समाचार मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या स्टाईलमध्ये घेतला.**

मनोज जरांगे पाटील यांनी लक्ष्मण हाके यांच्या वक्तव्याचा जोरदार समाचार घेतला आहे. मी आतापर्यंत त्याच्यावर काही बोललो नाही, तुम्हाला आतापर्यंत बोललो नाही, लक्षात ठेवा, तुमच्या लेकीबाळी मी माझ्या लेकीबाळी प्रमाणे समजतो. अजित पवारांचे दोन कार्यकर्ते

### लक्ष्मण हाके यांच्याविरोधात गेवराई तालुक्यात गुन्हा दाखल

ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्याविरोधात गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलिस ठाण्यात मराठा समाजातील मुलींबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यासाठी गुन्हा दाखल झाला आहे. बीडमधील शृंगारवाडी येथील सभेत हाके यांनी मराठा समाजाच्या मुलींच्या लग्नासंदर्भात आक्षेपार्ह विधान केले होते, ज्यामुळे मराठा समाज संतप्त झाला. त्यांनी ''मराठा मुलींचे लग्न आता आमच्या मुलांसोबत लावा'' असे वक्तव्य केले, ज्यामुळे मराठा समाजाने तलवाडा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.



धनंजय मुंडे, आणि छगन भुजबळ यांनी त्यांना हाताखाली धरले आहे, त्यांना काही बोलता येत नाही, म्हणून ते यांच्या तोंडून त्यांची भाषा वदवून घेत आहेत. त्यांचे विचार बीड जिल्ह्यात येऊन पाजळण्याचे ▶▶ पान २ वर




### वक्फ दुरुस्ती कायदा प्रकरणी सर्वोच्च न्यायालय आज अंतरिम आदेश देणार

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

सर्वोच्च न्यायालय सोमवारी (१५ सप्टेंबर) वक्फ दुरुस्ती कायदा प्रकरणी अंतरिम आदेश देणार आहे. वक्फ दुरुस्ती कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी झाल्यानंतर २२ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी निर्णय राखून ठेवला होता. सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्या नेतृत्वातील खंडपीठाने याचिकाकर्ते आणि केंद्र सरकारची भूमिका सुनावणीदरम्यान ऐकून घेतली होती. ▶▶ पान २ वर


# परिस्थिती विदारक, सामाजिक एकोपा राखा

## मराठा–ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर शरद पवारांचे मोठें विधान

नाशिक । प्रतिनिधी

**सामाजिक ऐक जपणाऱ्या महाराष्ट्रात आजची परिस्थिती विदारक झाली आहे. सामाजिक ऐक्याची वीण तुटली जात असल्याची चिंता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष, खासदार शरद पवार यांनी व्यक्त केली. राज्यातील सामाजिक सलोखा बिघडत असताना सर्वांनी सामाजिक एकोपा राखण्यासाठी एकत्र येणे गरजेचे आहे, असे आवाहनही त्यांनी केले.**

दिंडोरी तालुक्यातील आंबे दिंडोरी येथे कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या स्मारकाचे उद्घाटन पवार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. राज्यात एकीकडे मराठा आरक्षणाचा मुद्दा गाजत असताना दुसरीकडे ओबीसी नेतेही आक्रमक झाले आहेत. त्यामुळे, गावागावात ओबीसी आणि



मराठा असा सामाजिक समतोल ढासळत चालल्याचे दिसून येत आहे. त्या अनुषंगाने शरद पवार यांनी महत्त्वाचे वक्तव्य केले आहे. शरद पवार म्हणाले, महाराष्ट्राचे चित्र सध्या थोडे वेगळे झालेले आहे. समतेचा विचार हा अस्थिर होतोय का काय असे दिसत आहे. सामाजिक ऐक्याची वीण ▶▶ पान २ वर

# बीड रेल्वे स्थानकाची जिल्हा प्रशासन व रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पाहणी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात १७ सप्टेंबर २०२५ रोजी बीड ते अहिल्यानगर या मार्गावर पहिल्यांदच रेल्वे प्रत्यक्षात धावणार आहे. त्या अनुषंगाने रेल्वे आणि जिल्हा प्रशासनाची जय्यत तयारी सुरू आहे. त्याअनुषंगाने रविवारी मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक दरम वीर मीणा आणि जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीड स्थानकाला प्रत्यक्ष भेट देवून पूर्वतयारीची पाहणी करत संबंधीताकडून सविस्तर आढावा घेतला.

यावेळी पीसीएसटीईचे मनिंदर सिंग उप्पल, विभागीय रेल्वे व्यवस्थापक राजेशकुमार वर्मा,



पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, मुख्य अभियंता बी.के.सिंह, उपमुख्य अभियंता डी.डी.लोळगे, मुख्य अभियंता ▶▶ पान २ वर

# 'लाडकी बहीण'मुळे वित्तीय तूट नाही

## राज्य सरकारचे न्यायालयात शपथपत्र

नागपूर । प्रतिनिधी

'लाडकी बहीण'सारख्या कल्याणकारी योजनांनंतरही राज्यातील वित्तीय तूट तीन टक्क्यांपेक्षा कमीच असेल. त्यामुळे याचिकाकर्त्याला दंड ठोठावित या विरोधातील याचिका फेटाळून लावावी, अशी विनंती राज्य सरकारने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात शपथपत्रात केली आहे. तर याचिकाकर्त्याने आपली भूमिका कायम ठेवत त्याच्या समर्थनार्थ काही तथ्ये मांडल्याचा दावा केला आहे.

सामाजिक कार्यकर्ते अनिल वडपल्लीवार यांनी योजनेविरोधात दाखल केलेली जनहित याचिका प्रलंबित आहे. ▶▶ पान २ वर

# ओबीसी आरक्षणावर बालंट अन् मुलिच्या नोकरीची चिंता या विवंचनेतून वडलाची आत्महत्या

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रात आरक्षणावरून वातावरण चांगलेच तापलेले आहे. दोन दिवसापुर्वी लातूर येथील तरूणाने ओबीसी आरक्षणासाठी नदित उडी मारून आत्महत्या केली होती. आता बीड मध्येही असाच प्रकार घडला आहे. ओबीसी आरक्षणावर आलेले बालंट अन् मुलिच्या नोकरीची चिंता या विवंचनेतून वडलाने आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. ओबीसी



आरक्षणासाठी लागोपाठ दोन आत्महत्या झाल्याने खळबळ उडाली आहे.

राज्यभरात मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून आक्रमक वातावरण पाहायला मिळत असताना बीड तालुक्यातील नाथापुर गावात गोरख नारायण देवडकर या ५० वर्षीय व्यक्तीने आत्महत्या केली आहे. ओबीसी आरक्षण जात असल्याच्या विवंचनेतून या व्यक्तीने आत्महत्येचे पाऊल उचलल्याचे त्यांच्या कुटुंबाने सांगितले. गोरख देवडकर यांना पाच मुली असून, दोन मुली पोलीस भरतीची तयारी करत आहेत. मात्र सध्या राज्यातील आरक्षणाची स्थिती पाहता मुलीच्या शिक्षणाचे आणि नोकरीचे कसे होईल? असा प्रश्न त्यांना ▶▶ पान २ वर

# बिहारमध्ये 'इंडिया' आघाडीत जागावाटपावरून खेचाखेची

पाटणा । वृत्तसंस्था

बिहारमधील 'मतदार अधिकार यात्रा' दरम्यान काँग्रेस नेते राहुल गांधी आणि राष्ट्रवादी जनता दलाचे (राजद) नेता तेजस्वी यादव यांच्यातील सलोखा पाहून इंडिया आघाडीत जागावाटप सहज पार पडेल, अशी आशा व्यक्त केली जात होती. मात्र, आता या दोन्ही प्रमुख सहयोगींमध्ये तणाव निर्माण झाला आहे.

काँग्रेस पक्ष यात्रेदरम्यान मिळालेल्या मोठ्या जनसमर्थनामुळे उत्साही झाला असून, त्यांनी थेट ७० विधानसभा जागांची मागणी केली आहे. २०२० च्या निवडणुकीत काँग्रेसने याच संख्येवर लढत १९ जागा जिंकल्या होत्या. शिवाय, मागील ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१२ सप्टेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १८.०० क्विंटल | २,५०० | २,८७० | २,६७२ |
| ज्वारी/हायब्रिड :९१.०० क्विंटल | १,८०० | २,९०१ | २,३५३ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ०.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| उडीद : ५७.५० क्विंटल | ४,२०० | ५,९६१ | ५,०५२ |
| बाजरी: ५५.५० क्विंटल | २,१०१ | २,८०० | २,५८० |
| मुग:९.०० क्विंटल | ३,९०१ | ७,१०० | ५,६७५ |
| सोयाबीन: २२.५० क्विंटल | ४,१०० | ४,३११ | ४,२३७ |
| हरभरा: ५.५० क्विंटल | ४,५७० | ५,४०० | ४,९८५ |

# ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी विश्वास पाटील

पुणे । प्रतिनिधी

**९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी लेखक विश्वास पाटील यांची निवड करण्यात आली आहे. अध्यक्षपदाच्या शर्यतीत अनेकांची नावे चर्चेत होती. मात्र, अखेर पानीपतकार विश्वास पाटील यांच्या नावाची वर्णी लागली आहे.**


साताऱ्यात हे संमेलन होणार असून अध्यक्ष निवडण्यासाठी पुण्यातील साहित्य परिषदेत रविवारी सकाळी अकरा वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती. साहित्य महामंडळाच्या वेगवेगळ्या शाखांकडून वेगवेगळ्या साहित्यिकांची नावे अध्यक्षपदासाठी सुचवण्यात आली होती. मात्र, विश्वास पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले असून, त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. अध्यक्षपदाच्या शर्यतीत 'पानिपत'कार विश्वास पाटील 'कोसला'कार भालचंद्र नेमाडे, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठीच्या समितीचे अध्यक्ष रंगनाथ पठारे यांच्याही नावाची चर्चा होती. मात्र, विश्वास पाटील यांचे नाव अंतिम करण्यात आले.

विश्वास पाटील हे मराठी साहित्यप्रकारातील प्रसिद्ध लेखक आहेत. त्यांनी अनेक विषयांवर लेखन केले असून, त्यांच्या नावावर अनेक पुस्तक आहेत. त्यांची पानिपत ही ▶▶ पान २ वर

# गेवराई तालुक्यात कोसळधार अनेक गावांचा संपर्क तुटला

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यात शनिवार दि. १३ जूलै च्या रात्री पासून मुसळधार पाऊस सुरू असून, या पावसाने नदी – नाल्यांना पूर आला आहे. रात्रभर कोसळधार राहिल्याने गेवराई तालुक्यातील गेवराई–उमापूर राज्य मार्ग आणि गेवराई–राक्षसभुवन रस्त्यावरच्या पुलावरून पाणी ओसंडूनवाहू लागले. यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. दरम्यान, कामा शिवाय बाहेर पडू नका. काळजी घ्या, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.



गेवराई तालुक्यातल्या विविध भागात जोरदार पाऊस सुरू आहे. शनिवार ता. १३ जूलै रोजी ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# राधाकृष्णन यांना कोंडी फोडावी लागेल

भारताचे पंधरावे उपराष्ट्रपती म्हणून सी पी राधाकृष्णन यांनी नुकतीच शपथ घेतली. केंद्रातील सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीने त्यांना उमेदवारी जाहीर केली तेव्हाच त्यांचा विजय निश्चित होता. उपराष्ट्रपती संसदेचे वरिष्ठ सभागृह राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. या सभागृहाचा कारभार त्यांना चालवायचा असतो. तेथेच या पदावरील व्यक्तीची खरी कसोटी असते आणि त्याला राधाकृष्णन यांनाही सामोरे जावे लागणार आहे.

किशोरावस्थेतच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडले गेलेल्या राधाकृष्णन यांनी जनसंघाच्या माध्यमातून राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. नंतर ते तामिळनाडूत भारतीय जनता पार्टीचा चेहरा बनले. हा त्यांचा राजकीय भूतकाळ झाला. वर्तमानात त्यांना काही निर्णय घेताना अथवा नव्या भूमिकेत वावरताना यात बदल करणे क्रमप्राप्त होईल. त्याचे कारण राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभेचे सभापती ही पदे तुमची विचारधारा आणि तुमचा पूर्वीचा राजकीय पक्ष कोणता होता याच्या पलिकडे असतात. त्यांना आपला आणि विरोधी असा भेदभाव करता येत नाही आणि त्यांच्याकडून तशी अपेक्षाही नसते. याच कारणास्तव राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या व्यक्तींची निवड व्हावी असा अलिखित संकेत आहे. राधाकृष्णन यांच्यासमोर मोठे आव्हान असेल ते येथेच. भाजपचे नेते या आपल्या प्रतिमेतून बाहेर पडत त्यांना राज्यसभेचा कारभार सर्वांना विश्वासात घेत आणि सगळ्यांच्या मनात विश्वास निर्माण करतच करावा लागेल. या अगोदर जगदीप धनखड या पदावर होते. धनखड मुळात भाजपचे नव्हते. मात्र त्यांचे भाजपशी चांगले सूत जुळले.

त्यामुळे प. बंगालसारख्या महत्त्वाच्या राज्यात अगोदर राज्यपाल म्हणून काम करण्याची त्यांना संधी दिली गेली. नंतर धक्कातंत्राचा भाग म्हणून अचानक त्यांना उपराष्ट्रपती पदाची उमेदवारी दिली गेली. धनखड यांचा बंगालमधील ममता बॅनर्जी यांच्या सरकारशी असलेला संघर्ष त्यांना या बढतीसाठी कामी आला. राज्यसभेचे अध्यक्ष झाल्यावर त्यांच्याकडे संशयानेच पाहिले गेले आणि त्याबद्दल अनेकदा ओरडही झाली. सभागृहातील काँग्रेसचे वरिष्ठ नेते मल्लिकार्जुन खर्गे, तृणमूलचे ज्येष्ठ नेते, आम आदमी पक्षाचे नेते यांच्याशी धनखडांचा संघर्ष व त्यांच्यावरचा अविश्वास प्रत्येक अधिवेशनात दिसला. विरोधकांना संधी दिली जात नाही येथपासून विरोधकांचे माइक बंद केले जातात असे आरोप संसदेच्या दोन्ही सभागृहांतील नेत्यांनी अध्यक्षांवर आणि सभापतींवर केले आहेत.

राज्यसभेत तुलनेने अधिक जाणकार व्यक्ती असतात असे मानले जाते. विविध विषयांतील त्यांच्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा लाभ व्हावा यासाठी राजकीय पक्षांकडूनच दिग्गजांना राज्यसभेसाठी संधी दिली जाते. अर्थात आता तसेही काही राहिले नाही; मात्र अजूनही तेथे बर्यापैकी शांततेत कामकाज चालते. धनखडांकडे जेव्हा ही जबाबदारी होती त्यावेळी जे आरोप त्यांच्यावर झाले ते त्यांच्यावर नाही तर राज्यसभेच्या अध्यक्षांवरच होते. नव्या अध्यक्षांना म्हणजे राधाकृष्णन यांना सर्वप्रथम ही कोंडी फोडावी लागणार आहे. सत्ताधारी आणि विरोधी पक्ष यांच्यातील संघर्षात उपराष्ट्रपतींना तटस्थच राहावे लागते. त्यात जर त्यांच्याकडून गल्लत झाली तर पक्षपाताचा आरोप होतो. राधाकृष्णन यांना यासाठी प्रत्येक पावलावर सावध राहावे लागेल. आपल्या जुन्या लागेबांध्यांना जागत जर राज्यसभेचे अध्यक्ष सत्ताधारी पक्षाला झुकते माप देत आहेत असे विरोधकांना वाटू लागले तर सभागृहाचे कामकाज होऊच शकणार नाही. अलीकडच्या काळात दोन्ही सभागृहांत असे गदारोळाचे आणि तीव्र संघर्षाचे प्रकार वारंवार पाहायला मिळाले. त्यामुळे सभागृहातील भविष्यातील सत्ताधारी–विरोधकांच्या संघर्षाचे क्षण हा राधाकृष्णन यांच्या कसोटीचा काळ ठरणार आहे.

मुळात त्यांच्या अगोदरचे उपराष्ट्रपती धनखड यांचे सत्ताधाऱ्यांसोबतच मतभेद झाले होते. ते तीव्र स्वरूपाचे होते व त्यामुळेच त्यांनी तडकाफडकी राजीनामा दिला. भविष्यात पुन्हा अशी अवघडल्यासारखी स्थिती होऊ नये याची खबरदारी सरकारने राधाकृष्णन यांच्या निवडीद्वारे घेतल्याचे म्हटले जाते. त्यामुळेच आपल्याच मुशीत तयार झालेल्या व्यक्तीला त्यांनी आणले असे जाहीरपणे सांगितलेही गेले. नेमकी हीच बाब राधाकृष्णन यांच्यावर त्यांची राजकीय निष्पक्षता सिद्ध करण्यासाठी दबाव निर्माण करणारी असणार आहे. सभागृहाची प्रतिष्ठा जपताना त्यांना संतुलन साधावे लागेल. उपराष्ट्रपतींना राजकीय अनुभव आहे ही त्यांच्यासाठी जमेची बाजू ठरावी. तथापि, निष्पक्षपणा, धैर्य आणि संवैधानिक मूल्यांनुसार काम करून सभागृहातील दोन्ही बाजूंमध्ये संतुलन निर्माण केले जाऊ शकते आणि त्याद्वारे सभागृहाची मर्यादा आणि प्रतिमाही उजळ ठरवता येऊ शकते ही संधी राधाकृष्णन यांच्यासमोर आहे.

# पुरग्रस्तांच्या पाठीशी ‘शिवछत्र’ परिवार खंबीरपणे उभा आहे–अमरसिंह पंडित

## पूरग्रस्त भागाची आ. विजयसिंह पंडित आणि अमरसिंह पंडित यांनी केली पाहणी करून दिला धिर

गेवराई । प्रतिनिधी

सरासरी पेक्षा अधिक झालेला पाऊस आणि नाथसागरातून गोदावरी पात्रात १ लाख १३ हजार क्युसेस पाणी सोडल्याने गेवराई तालुक्यातील गोदावरी नदीकाठच्या गावांमध्ये पूरग्रस्त परिस्थिती निर्माण झाली असून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांन पूरग्रस्त भागाची पाहणी करून शेतकरी व नागरिकांना धीर दिला. पुरामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शासकीय मदत मिळवून देण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. काळजी करू नका शिवछत्र परिवार तुमच्या पाठीशी आहे,अशी ग्वाही त्यांनी यावेळी देऊन प्रशासकीय अधिकाऱ्यांना सुचना केल्या, यावेळी तहसीलदार संदीप खोमणे, भाऊसाहेब नाटकर यांच्यासह महसूल विभागाचे कर्मचारी, संबंधित गावातील पदाधिकारी, ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

अचानक झालेली अतिवृष्टी, मुसळधार पाऊस आणि पैठण येथील नाथसागरातून सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे गेवराई तालुक्यातील गोदाकाठावरील गावामध्ये पूरग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी



पाण्याखाली गेल्या असून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांनी गोदावरी नदी काठावरील राजापूर, काठोडा, सावळेश्वर, म्हाळस पिंपळगाव, कटचिंचोली यासह गोदावरी नदीकाठच्या गावातील नुकसानीची पाहणी करून पंचनामे करण्याचे निर्देश यावेळी प्रशासनाला दिले. गेवराई विधानसभा मतदारसंघात काल रात्री अतिवृष्टी झाल्यामुळे शेती आणि पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. गोदावरी नदी आणि उपनद्यांना पूर आल्यामुळे अनेक ठिकाणी विशेषतः गोदावरी नदीकाठच्या भागांमध्ये अनेक गावांचा संपर्क तुटला असून गेवराई – राक्षसभुवन रस्त्यावरील गंगावाडी नजीकच्या पुलावर अमृता नदीचे पाणी आल्यामुळे या भागातील रहदारी बंद आहे. अनेक ठिकाणी महापुराचे पाणी लोकांच्या घरात गेल्यामुळे शेतीबरोबरच घरांचेही नुकसान झालेले आहे. मागील दोन दिवसांपासून शेतात पाणी साठून राहिल्यामुळे उभ्या पिकांचेही मोठे नुकसान झालेले आहे. त्यामुळे शेती, उभी पिके, पशुधन, शेतातील गोठे, शेतघर यासह वाडी, वस्त्यावरील राहती घरे यांचे अतिवृष्टी, मुसळधार पाऊस आणि महापुरामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे अमरसिंह पंडित यांनी प्रशासनाला निर्देश दिले. गेवराई विधानसभा मतदारसंघातील गोदाकाच्या भागांमध्ये सरासरीपेक्षा अधिकचा पाऊस अक्षरशः ढगफुटी सारखा झाल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली. गव्हाणथडी, काळेगाव ता. माजलगाव यासह संपूर्ण गेवराई विधानसभा मतदारसंघात ज्या ज्या ठिकाणी अतिवृष्टी आणि महापुरामुळे नुकसान झालेले असेल त्या सर्व नुकसानग्रस्तांना शासनाकडून नुकसान भरपाई मिळवून देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी सांगितले.

## दसरा व दिवाळीच्या निमित्ताने तरी बीड नगर प्रशासनानी तात्काळ दखल घ्यावी–नवनाथ शिराळे

बीड । प्रतिनिधी

बीड शहरांमध्ये सध्या जागोजागी रस्त्याची दुरवस्था झाली असून नागरिकांना चालताना नाहक त्रास सहन करावा लागत आहे खड्ड्यात रस्ता आहे की रस्त्यात खड्डे आहेत हेच समजत नाही आणि सध्या बीड शहराच्या जवळ असलेले बिंदुसरा प्रकल्प व सांडून वाहत असताना देखील बीड शहराला पंधरा ते वीस दिवसाला पाणी सोडले जाते हे दुर्दैव बिड करायचे आहे की काय असे देखील बीड शहरातील नागरिकांमधून संतापताची लाट सध्या व्यक्त होत आहे तोंडावरच दसरा व दिवाळी येऊन ठेपलेली आहे सध्या पितृ पक्ष पंधरवाडा चालू असून महिला भगिनी घरातील भांडे धूने कपडे दसऱ्यानिमित्त धुण्यासाठी काढत असतात तसेच घरोघरी रंग रगोटी देखील केली जाते परंतु पाण्याअभावी ही कशी रंगरंगोटी करावी कसे धुणे धुवावे कसे भांडे मोठे धुने करावे कसे



मोठे मोठे टेबल बाकडे खुर्च्या घरातील सर्वच साहित्य पंखा सह सर्व साहित्य धुण्यासाठी पाणी लागते परंतु १५ ते २० दिवसाला बीड शहराला पाणी सोडले जाते मग हे कसे साहित्य हे धुवायचे पाण्याअभावी तसेच ठेवायचे की काय असा प्रश्न देखील माता भगिनींना बीड शहरातील पडलेला आहे शिवसागर यांची सत्ता बीडला असल्यापासून बीड शहराला पंधरा ते वीस दिवसाला पाणी मिळत आहे आणि आता सध्या नगरपालिकेचे असलेले प्रशासक साहेब यांनी या महत्त्वाच्या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ दररोज बीडकरांना पाणी सोडावे असे नागरिकांमधून बोलले जात असल्याचे मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी प्रसिद्धी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून म्हटले आहे जर येणाऱ्या दोन दिवसात जर बीड शहराला पाणीपुरवठा जर सुरू नाही केला तर बीड नगर प्रशासनाला कुलूप ठोकले जाईल असा इशारा देखील शिराळे पाटील यांनी दिला आहे याची दखल प्रशासक ओसिओ मुख्याधिकारी नगर परिषद बीड यांनी घ्यावी असे आवाहन देखील भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे तसेच बीड शहरातील गल्लोगल्ली मध्ये सध्या अंधाराचे साम्राज्य निर्माण झाले आहे म्हणून येणाऱ्या हिंदूंचा महत्त्वाचा असणाऱ्या या सणाच्या निमित्ताने दिवाळी आणि दसऱ्याच्या निमित्ताने तरी बीड नगर प्रशासनाने लाईटची व्यवस्था खंब्यावर लाईट लावून करावी महत्त्वाच्या ठिकाणी शहरातील प्रत्येक गल्लीमध्ये बीड शहराचे दैवत असलेला श्री खंडेश्वरी मंदिर परिसरामध्ये देखील लाईट व्यवस्था करावी महाराष्ट्राची श्री कुलस्वामिनी तुळजाभवानी यांचे ठिकाण असलेल्या बीड शहरातील खासबाग परिसरामध्ये देवीच्या परिसरामध्ये देखील नाईट ची पाण्याची व्यवस्था करावी बीड शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी महत्त्वाच्या पोलवर लाईट बसवावे व रिपेरिंग दुरुस्ती करावी असे आव्हान देखील मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील माजी सभापती नगरपरिषद यांनी केले आहे.

पान ६ वरून...

### पद्मश्री डॉ. रत्नाप्पाण्णा

आला आहे. डॉ. रत्नप्पा कुंभार हे स्वातंत्र्यसैनिक, संविधान समितीचे सदस्य आणि पहिले कॅबिनेट मंत्री होते. त्यांना अभिवादन करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात समाजातील विविध क्षेत्रातील १५ यशस्वी सामाजिक कार्यकर्त्यांना लोकरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. कार्यक्रमाला आमदार महेश सावंत, आयएएस अधिकारी अजित कुंभार, उपजिल्हाधिकारी, मुंबईच्या मनीषा कुंभार, महापौर, मुंबई च्या किशोरीताई पेडणेकर, दत्ता नरवणकर यांच्यासह आदींची उपस्थिती राहणार आहे. बीड सह राज्यातील कुंभार समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शिक्षक रामदास कुंभार, चनबस वायकर, अर्जुन दळे, भीमराव देळे, गणेश जाधव, कैलास कुंभार, जालिंदर करडकर, राम पोपळे, विठ्ठल गोरे, दत्ता रामरूले, अंकुश इतापुरे, बळीराम करडकर, महेश इटकर, राहुल कुर्लेकर, रावसाहेब देशमुख, अंबादास गोरे, नवनाथ निर्दुडकर, रमेश जाधव, राम जाधव, श्रीहरी लोखंडे, रवी कुंभार, दिपक चित्रे यांच्यासह बीड जिल्हा कुंभार समाज बांधवांच्या वतीने करण्यात आले आहे.

-------------

### जिल्ह्यातील उर्वरित शेतकऱ्यांना

या जिल्ह्यात दळणवळणाची साधने मोठ्या प्रमाणात उपलब्ध नाहीत. तसेच सदरील जिल्हा मराठवाड्यातील मागास विभाग म्हणून ओळखला जातो. उद्योगधंदाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात उपलब्ध नाही त्यामुळे या जिल्ह्यातील बहुतांश मजूर ऊस तोडी साठी इतर जिल्ह्यात जातात. या भागात शेती शिवाय पर्याय नाही . मागेल त्याला सौर ऊर्जा या ब्रीदवाक्याप्रमाणे प्रत्यक्षात पैसे भरून देखील सौर ऊर्जा मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे .या भागात आर्थिक ओढा ताण व कर्ज बाजारीपणामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. सौर ऊर्जा पैसे भरून देखील मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोषाची वातावरण आहे. बीड जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांनी सौर ऊर्जाची रक्कम भरलेली आहे .त्या सर्व शेतकऱ्यांना तात्काळ सौर ऊर्जा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी पुन्हा बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी मा. मुख्यमंत्री व कार्यकारी अभियंता बीड यांच्याकडे केलेली आहे.

-------------

### बंजारा महामोर्चाची तयारी

पारंपरिक वेशभूषेत महिला भगिनी होणार दाखल आज होणाऱ्या मोर्चाला मध्ये जिल्ह्यातील बंजारा बांधव दाखल होणार आहे यात महिला भगिनींही आपल्या पारंपरिक वेशभूषामध्ये मोर्चा सहभागी असणार असल्याचे म्हटले आहे.

**असा निघणार मोर्चा**

सोमवारी ता.१५ सप्टेंबर रोजी सकाळी अकरा वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून मोर्चाला सुरुवात होणार त्यानंतर सुभाष रोड मार्गे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला अभिवादन करून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा अभिवादन करत मुख्य स्टेज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दाखल होणार आल्याचे म्हटले आहे.

**अशी असेल पार्किंग व्यवस्था**

मोर्चासाठी बीडमध्ये दाखल होणाऱ्या जिल्ह्यातील वाहनांची कृती समिती व पोलीस प्रशासनाकडून पार्किंग सुविधा करण्यात आली आहे. यात माजलगाव गेवराईत रोड वरून येणाऱ्या वाहनांची मोंढा रोड येथील फटका स्टॉलचे मोकळे ग्राउंड तर वडवणी, अंबाजोगाई, धारूर, परळी, केज या रुटचे वाहने माने कॉम्प्लेक्स समोरील मोकळी जागा तर आष्टी–पाटोदा–शिरूर आणि बीड तालुक्यातील वाहने आयटीआय ग्राउंड येथे करण्यात आली आहे.

**पाचशे स्वयंसेवक सज्ज**

मोर्चात येणाऱ्या नागरिकांना योग्य मार्ग दाखविन्यासाठी तसेच मोर्चा सुरळीत जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाला सहकार्य करण्यासाठी कृती समितीकडून टी शर्ट देत पाचशे स्वयंसेवक सज्ज करण्यात आले आहे.

-------------

### शिवसेनाच्या वतीने पंतप्रधान

होण्यास वेळ लागणार नाही असे म्हणाले ,पंतप्रधान नरेंद्र मोदी हाय हाय, पाकिस्तान धार्जिणा भारत सरकारचा धिक्कार असो, शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो, उद्धवसाहेब ठाकरे तुम आगे बढो अशा गगनभेदी घोषणा शिवसैनिक देत होते. यावेळी जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके, माजी माजलगाव प्रमुख नामदेव सोजे, उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, तालुका सचिव नंदुभाऊ येवले , तालुका संघटिका सुनिता जाधव , तालुका संघटिका कौशल्या कदम शेमशहा शेख , किर्ती पारिख ,शितल कांबळे,सुरेका डोरले , पल्लवी माळी , मंदाकिनी जाधव , कल्पना वावधाने ,कचरु जावळे ,जचंदाताई मुळे ,संगीता जंगले ,सुरैया शेख , लक्ष्मी डिस्प्ले ,सुनिता झिंगे , चंद्रकला झेंगरे ,लक्षमलक्ष्मी जंगले , तारामती सोनटक्के , चंद्रभागा काळे ,निता ज़गले ,दा रका पट्टे कर यांच्यासह पदाधिकारी व शिवसैनिक महिला आघाडीच्या कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-------------

### बीड जिल्ह्यात महिला सन्मान

आघाडीच्या कार्यकर्त्यांनी रोखठोक सवाल केला की, महिला सशक्तीकरण हे केवळ भाषणापुरतेच आहे का? महिला आरक्षणाच्या नावाखाली खुर्ची मात्र घरातील पुरुषांना देणे, ही थेट लोकशाहीची पायमल्ली आहे. जर महिलांनीच स्वतः पुढे येऊन निर्णय घेतले नाहीत, तर आरक्षणाचा खरा हेतू हरवेलला आहे या संपूर्ण प्रकारामुळे सावता सेनेच्या वतीने संताप व्यक्त होत आहे. बैठकीतच महिलांचा अपमान होत असेल तर गावागावातील महिला राजकारणी, कार्यकर्त्या आणि सामान्य महिलांचा आत्मविश्वास नेमका कुठे टिकणार? असा सवाल जनतेतूनही केला जात आहे.महिला आरक्षण म्हणजे महिलांच्या हाती सत्ता, की पुरुषांच्या हातातली बाहुली?हा सवाल सावता सेनेने उपस्थित करून प्रशासन, आमदार आणि राजकीय पक्षांना जबाबदार धरले आहे.

---------

पान १ वरून...

### शेतकऱ्यांच्या फोन कॉल्स आंदोलनाने

कांद्यासाठी लोकप्रतिनिधींनी शासन दरबारी प्रयत्न करीत असल्याचे आश्वासन दिले तर विरोधी गटातील लोकप्रतिनिधींनी केंद्र सरकारवर टीका केली. या फोन कॉल्समुळे अनेक लोकप्रतिनिधींची धांदल उडाली असून, अनेकांनी स्वीय सहायकांशी शेतकऱ्यांना चर्चा करण्यास सांगितले. शेतकरी संघटनेचे भारत दिघोळे यांनी आवाहन केल्यानुसार, हजारो शेतकरी आंदोलनात सहभागी झाले.

--------

### वक्फ दुरुस्ती कायदा प्रकरणी सर्वोच्च

केंद्र सरकारने सुनावणीवेळी कायद्याचा जोरदार बचाव केला होता. सरकारच्यावतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले होते की, वक्फ एक धर्मनिरपेक्ष संकल्पना आहे. कायद्यात संवैधानिकतेचा अंदाज घेतला आहे, त्यामुळे कायद्याला स्थगिती देता येणार नाही. शिवाय, वक्फ ही इस्लामिक संकल्पना असली तरी ती इस्लामचा अविभाज्य भाग नाही, असे ते म्हणाले होते. याचिकाकर्त्यांचे नेतृत्व करणारे वरिष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी या कायद्याचे वर्णन न्यायिक प्रक्रियेशिवाय वक्फ ताब्यात घेण्याचे साधन असे केले होते. हा मनमानी कायदा असल्याचे ते म्हणाले होते. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी कायद्याला विरोध करत स्थगितीची मागणी केली होती.

--------

### लक्षात ठेवा ‘आमच्या लेकी–बाळीपर्यंत

काम करू नका, त्या दोघांना बोलता येईना म्हणून, त्या दोघांनी तुम्हाला हाताखाली धरले आहे. परंतू लक्ष्मण हाके यांच्या ते काही लक्षात येत नाही. गरीब धनगर समाज बांधवांच्या हे लक्षात आलेले आहे. म्हणून धनगर लोक त्यांना जवळ करत नाही, मी त्यांच्यावर काहीच बोललो नव्हतो, त्याला देखील हेच कारण होतं. ते म्हणजे आम्हाला माहिती आहे, की यांचे गढूळ विचार आहेत. कुणाच्याही लेकीबाळीवर आम्ही आतापर्यंत बोललेलो नाही, कारण धनगराची लेक आहे, ती आमची पण लेक आहे. धनगर बांधवांच्या हे लक्षात आलेले आहे, की हे विनाकारण भांडण विकत घेत आहेत, अशा शब्दात मनोज जरांगे पाटील यांनी लक्ष्मण हाके यांच्यावर निशाणा साधला आहे.

ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी लग्नाबाबत वादग्रस्त वक्तव्य केले होते, त्यामुळे संपूर्ण मराठा समाज आक्रमक झाला आहे. लक्ष्मण हाके यांच्या या वादग्रस्त विधानाचा निषेध करण्यात येत आहे, दरम्यान यावर आता मनोज जरांगे पाटील यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे, त्यांनी लक्ष्मण हाके यांना इशारा देतानाच मंत्री छगन भुजबळ आणि आमदार धनंजय मुंडे यांच्यावर देखील अप्रत्यक्ष निशाणा साधला आहे.

--------------

### बीड रेल्वे स्थानकाची जिल्हा प्रशासन व

(इलेक्ट्रीक) विनीत कुमार, उपमुख्य अभियंता (इलेक्ट्रीक) ज्ञानेंद्रसिंग, विभागीय अधिकारी जीतेंद्र सिंह तसेच उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यासह रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या पथकाने यावेळी संपूर्ण व्यवस्थेची पाहणी केली. हा कार्यक्रम राज्य सरकारच्या मराठवाडा मुक्ती संग्राम दिवस उत्सव आणि माननीय पंतप्रधानांच्या संबोधित होणाऱ्या आरोग्य अभियान कार्यक्रमाचा भाग असणार आहे. रेल्वेचे महाव्यवस्थापक दरम वीर मीणा यांनी आगामी कार्यक्रमाच्या पूर्वतयारीच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.

----------

### परिस्थिती विदारक, सामाजिक

उसवली जात असल्याचे चित्र आहे. माझ्या मते महाराष्ट्रासमोर हे एक प्रकारचे आव्हान आहे. मात्र, काय वाट्टेल ती किंमत मोजू पण सामाजिक ऐक्य जपू, महाराष्ट्र एकसंघ कसा राहिल यासाठी आणि महाराष्ट्रातील सर्व जाती धर्मांच्या लोकांना एकत्रित कसं ठेवता येईल यासाठी व महाराष्ट्राचा लौकिक पुढे घेऊन जाण्यासाठी जे काही करावे लागेल ते करण्यासाठी तुम्ही, आम्ही आणि सर्वांनी पुढे आले पाहिजे, असे त्यांनी म्हटले आहे.

-----------

### बिहारमध्ये ‘इंडिया’ आघाडीत

लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या ३ जागांनी पक्षाचा आत्मविश्वास वाढविला आहे. बिहार काँग्रेस अध्यक्ष राजेश राम यांनी चर्चेची अंतिम टप्प्यातील स्थिती स्पष्ट करत, लवकरच घोषणा होईल असे सांगितले. दरम्यान, राजदप्रमुख लालूप्रसाद यादव यांनी काँग्रेसच्या कठोर भूमिकेनंतर हस्तक्षेप केला आहे. राजद ५२ जागा देण्यास तयार असल्याची माहिती मिळाली आहे. मात्र, काँग्रेसकडून राजदच्या गडांतील २० ते २५ जागांवर दावा केल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. यामुळे काँग्रेसच्या स्वतःच्या आमदारांमध्येही अस्वस्थता वाढली आहे. राजदच्या नेत्यांमध्ये आणखी एक नाराजीची बाब म्हणजे राहुल गांधी यांनी अद्याप तेजस्वी यादव यांना आघाडीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा म्हणून मान्यता दिलेली नाही. दुसरीकडे, विकासशील इंसान पार्टीचे प्रमुख मुकेश सहनी यांनी आघाडी सत्तेत आल्यास उपमुख्यमंत्रीपदाची मागणी पुढे केली आहे. राष्ट्रवादी लोक जनशक्ती पक्ष प्रमुख पशुपती कुमार पारस आणि झारखंड मुक्ती मोर्चा आघाडीत सहभागी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे जागावाटप आणखी गुंतागुंतीचे होणार आहे. आघाडीतील सर्व घटक पक्षांची महत्त्वाची समन्वय समिती बैठक १५ सप्टेंबर रोजी पाटण्यात होणार असून, निवडणुकीपूर्वी ऐक्य टिकवण्यासाठी संयम आणि शहाणपणाची मोठी कसोटी लागणार आहे.

--------------

### ओबीसी आरक्षणावर बालंट अन् मुलिच्य

सतावत होता. याच विवंचनेतून त्यांनी आत्महत्या केली. जिल्हा रुग्णालयात देवडकर यांचा मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले असून राज्य सरकारने आमच्या कुटुंबाचा विचार करावा, अशी मागणी पीडित कुटुंबाने केली आहे. आपल्या वडिलाच्या आत्महत्या नंतर त्यांच्या मुलीने सांगितले की, जेव्हापासून मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण दिले तेव्हापासून माझे वडील सातत्याने चिंतेत होते. कारण त्यांना माझ्या नोकरीची जास्त चिंता होती. त्यांनी मजुरी करून आमच्या शिक्षणासाठी पैसा लावला. आधीच ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा आहे. आता त्यात मराठा समाज आला आहे. आपल्या मुलींचा कसे होईल? असे ते सतत मला बोलायचे. या चिंतेतून त्यांनी असे टोकाचे पाऊल उचलले. हे सांगताना मुलीच्या डोळ्यात अश्रू थांबत नव्हते. वडील मजुरी करायचे जे मिळेल ते काम करायचे. मुलींची आईही मजुरी करते. तीन बहिणींचे लग्न झाले आहेत. दोघी बहिणी पोलीस भरतीची तयारी करत आहेत. देवडकर यांच्या आत्महत्येमुळे संपूर्ण कुटुंब हादरून गेले आहे. घटनेनंतर गोरख देवडकर यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात आणण्यात आले. या आत्महत्येची माहिती समजताच नाथापूरसह परिसरात शोककळा पसरली आहे. गावकऱ्यांनी ही घटना अत्यंत दुर्दैवी असल्याचे सांगत सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी केली आहे.

-------

### ‘लाडकी बहीण’मुळे

शासनाच्या या अनाठायी खर्चामुळे पायाभूत सुविधा, प्रकल्प रखडले आहेत. सामाजिक कल्याणाचे उपक्रम कोलमडले आहेत. सरकारवर आठ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज असूनही राज्याने थेट रोख हस्तांतर आणि राजकीयदृष्ट्या प्रेरित खर्चासाठी निधी वाटप करणे सुरूच ठेवले असल्याचे या शपथपत्रात याचिकाकर्त्याने नमूद केले आहे. या प्रकरणावर न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती रजनीश व्यास यांच्यासमक्ष सुनावणी झाली. या वेळी राज्य सरकारने नवे शपथपत्र सादर केल्याची माहिती देण्यात आली. प्रत्युरात याचिकाकर्त्यानेसुद्धा नवे शपथपत्र दाखल केले. महाराष्ट्र वित्तीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन नियमांनुसार वित्तीय तूट ही तीन टक्क्यांपेक्षा कमी असायला हवी. महालेखापाल यांच्याकडून अंकेक्षण न झालेल्या बाबींबाबत अलीकडेच प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीनुसार राज्याची २०२४–२५ ची वित्तीय तूट ही २.६९ टक्क्यांच्या आसपास असेल. त्यामुळे कायद्यातील तरतुदींचे काटेकोर पालन होते आहे. किंबहुना, सर्वाधिक कमी वित्तीय तूट असलेल्या देशातील तीन राज्यांत महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. त्यामुळे कल्याणकारी योजनांमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला फटका बसतो आहे व वित्तीय तूट वाढत असल्याचा याचिकाकर्त्याचा दावा चुकीचा व असमर्थनीय असल्याचा प्रतिदावा राज्य सरकारने केला आहे. तसेच ही याचिका फेटाळून लावावी आणि याचिकाकर्त्याला दंड ठोठवावा, अशीही मागणी राज्याने केली आहे.

----------

### गेवराई तालुक्यात कोसळधार

सकाळपासून ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. दुपारी उकाडा जाणवत होता. सायंकाळी पाच वाजता पावसाला सुरुवात झाली. पावसाची रात्रभर उघडझाप सुरू होती. मध्यरात्रीनंतर पावसाने जोर धरल्याने, या कोसळधारेने नदी–नाले ओसंडून वाहत आहेत. गेवराई तालुक्यातील गेवराई–उमापूर राज्य मार्ग आणि गेवराई–राक्षसभुवन रस्त्यावरच्या पुलावरून पाणी ओसांडून वाहू लागल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. उमापूर मंडळात पावसाने कृपा केली. जून, जूलै आणि ऑगस्ट, या तीन महिन्यात फारसा पाऊस झाला नव्हता. पाणी साचले नव्हते. केवळ पिकांना दिलासादायक पाऊस झाल्याने, उमापूर, जातेगाव धोंडराई परिसरातील शेतकरी चिंताग्रस्त होते. अखेर, या परिसरात दमदार पाऊस झाला असून, शेतकर्यांनी समाधान व्यक्त केले आहे. ङ्ग दरम्यान, कामा शिवाय बाहेर पडू नका. स्वतःची काळजी घ्या, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

---------

### ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य

ऐतिहासिक कांदबरी प्रचंड गाजली. त्याच्या आगळ्यावेगळ्या लेखणीने वाचकांच्या मनावर त्यांनी आपल्या नावाची छाप सोडली आहे. त्यांची दुसरी ओळख म्हणजे ते माजी आयएएस अधिकारी आहेत. गेल्या तीन दशकांत विश्वास पाटील यांना साहित्य अकादमी पुरस्कारासह ७० हून अधिक पुरस्कार मिळाले आहेत, ज्यात प्रियदर्शनी नॅशनल अवॉर्ड, नाथमाधव पुरस्कार आणि भारतीय भाषा परिषदेचा साहित्य पुरस्कार यांचा समावेश आहे.

-------

cmyk


राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. १५ सप्टेंबर २०२५



## बीडच्या रेल्वेचे श्रेय कोणा एकाचे नाही, सर्वांचे : भाई थावरे



माजलगाव । प्रतिनिधी

चाळीसहून अधिक वर्षांच्या अथक संघर्षानंतर बीड जिल्ह्यातील बीड-नगर-परळी दरम्यान रेल्वे सेवा सुरू होऊन समस्त जिल्हावासियांच्या स्वप्नाला उजाळा मिळाला आहे. बीड रेल्वे सेवा हा कोणत्याही एका व्यक्तीचे यश नाही, तर अनेक दिग्गज नेत्यांनी, अनेक पिढ्यांनी, स्वातंत्र्य सैनिकांनी, कार्यकर्त्यांनी, संघटनांनी आणि जनतेने केलेल्या संघर्षाचे परिणामी साकारलेले ऐतिहासिक यश आहे. यामुळे बीडच्या रेल्वेचे श्रेय कोणा एकाचे नाही तर ते सर्वांचे आहे असे शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी म्हणाले.

भाई थावरे म्हणाले की, माजी खासदार लोकनेत्या केशरकाकू क्षीरसागर, लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्यासह आताच्या नेत्यांपर्यंत या सर्वांनी रेल्वे प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा केला. एवढेच नव्हेतर स्वातंत्र्य सैनिकांनी, कार्यकर्त्यांनी, संघटनांनी अनेक आंदोलने, मोर्चा, जिल्हा, राज्य व देश पातळीवर दिलेल्या संघर्षातून, पोलिसांच्या लाठींना तोंड देत, जेलवास भोगून आणि प्राणांची आहुती देऊन अखेर आज बीडला रेल्वे जोडणी मिळाली आहे.दि १७ सप्टेंबरपासून बीड-आष्टी रेल्वे सेवा अधिकृतपणे सुरू होणार आहे. ही रेल्वे सेवा परळीपर्यंत पूर्ण झाल्यावर स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठा गती लाभ मिळणार आहे. शेतकऱ्यांनीही उत्पादन बाजारपेठेत सुलभपणे वस्तू पोहोचवण्याचा मार्ग खुला होणार आहे. बीड-परळी रेल्वे सेवा सुरू झाल्याने स्थानिक व्यापार, उद्योगधंदे, शैक्षणिक प्रवास आणि सामान्य नागरिकांच्या दैनंदिन व्यवहारात मोठा बदल अपेक्षित आहे असेही भाई थावरे म्हणाले.

# समाजाच्या शेवटच्या घटकाच्या विकासासाठी प्रसारमाध्यमांची साथ आवश्यक - सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट

### राज्यस्तरीय वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीच्या बैठकीचे उद्घाटन

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

सामाजिक न्याय विभाग हा समाजातील तळागाळातील घटकांच्या कल्याणासाठी कार्यरत असलेला शासनाचा महत्त्वाचा विभाग आहे. या विभागाने हाती घेतलेल्या समाज हिताच्या विविध योजना आणि उपक्रम समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रसारमाध्यमांची साथ अत्यावश्यक असल्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले. समाज कल्याणासाठी योगदान देणाऱ्या पत्रकारांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी यावेळी जाहीर केले.

राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे छत्रपती संभाजीनगर येथे महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीच्या दोनदिवसीय बैठकीचे उद्घाटन आज पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इतर मागास बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे होते. यावेळी आमदार प्रशांत बंब, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी, माहिती व जनसंपर्क संचालक (वृत्त - जनसंपर्क) तथा समितीचे सदस्य सचिव किशोर गांगुर्डे, राज्य समितीचे सदस्य आणि विभागीय माहिती उपसंचालक उपस्थित होते. लोकशाहीमध्ये प्रसारमाध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. चांगले काम जनतेपर्यंत पोहोचवणे आणि चुकीच्या गोष्टींना आरसा दाखवणे, हे काम प्रसारमाध्यमे करतात. सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने अनेक चांगले उपक्रम हाती घेतले आहेत. या विभागामार्फत राज्यात नवीन १२० वसतिगृहे उभारण्याचे प्रयत्न सुरू असून, आतापर्यंत ४८ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. वसतिगृहात



राहणाऱ्या विद्यार्थ्यांना सकस आहार मिळावा यासाठी पावले उचलण्यात येत आहेत. समाजातील विषमतेची दरी कमी करून सामाजिक सलोखा निर्माण व्हावा, यासाठी अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांतील विद्यार्थ्यांना इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांसोबत एकत्रित प्रवेश देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यामुळे विद्यार्थीदशेपासूनच सामाजिक ऐक्याची भावना निर्माण होईल, असा उद्देश असल्याचे पालकमंत्री श्री. शिरसाट यांनी सांगितले.सामाजिक न्याय विभागामार्फत समाजकल्याणासाठी सकारात्मक बदल घडविण्यासाठी पावले उचलली जात आहेत. योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि वंचित घटकांच्या विकासाला गती देण्यासाठी प्रसारमाध्यमांनी सकारात्मक साथ द्यावी, असे आवाहन पालकमंत्री शिरसाट यांनी केले. समाज कल्याण क्षेत्रात, विशेषतः अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांच्या विकासासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित केले जाते. यापुढे या क्षेत्रात काम करणाऱ्या पत्रकारांनाही या पुरस्काराने गौरवण्याबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रसारमाध्यमांमुळे लोकशाही बळकट झाली आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात तंत्रज्ञानाचे चांगले बदल तसेच काही दुष्परिणामही दिसत आहेत. याबाबत प्रसारमाध्यमांनी समाजाला मार्गदर्शन करून येणाऱ्या आव्हानांची जाणीव करून द्यावी, असे मत आमदार प्रशांत बंब यांनी व्यक्त केले.प्रसारमाध्यमांमुळे प्रशासकीय कामकाजात सकारात्मक बदल घडतात, असे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी नमूद केले. तसेच, हुंडाबळी, बालविवाह, गर्भलिंग निदान आणि स्त्री-भ्रूण हत्या यासारख्या चुकीच्या प्रथांना आळा घालण्यासाठी प्रसारमाध्यमांनी पुढाकार घेऊन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.प्रारंभी माहिती व जनसंपर्क विभागाचे संचालक किशोर गांगुर्डे यांनी प्रास्ताविकात बैठकीच्या आयोजनाची भूमिका विशद केली आणि पत्रकारांना देण्यात येणाऱ्या सुविधांबाबत माहिती दिली. छत्रपती संभाजीनगर विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष डॉ. माधव सावरगावे यांनी उपस्थितांचे आभार मानले. सूत्रसंचालन जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांनी केले.

### योजनांच्या अंमलबजावणीत प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वाची: मंत्री अतुल सावे

लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ अशी प्रसारमाध्यमांची ओळख आहे. आजही समाजाला दिशा देण्याचे आणि शासनाच्या योजनांची माहिती शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य प्रसारमाध्यमे करतात. योजनांबाबत जनतेच्या प्रतिक्रिया मांडणे आणि आवश्यक बदल सुचवणे यातही प्रसारमाध्यमांची भूमिका मोलाची आहे. त्यामुळे शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत प्रसारमाध्यमांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे इतर मागास बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे यांनी सांगितले. इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत त्यांनी माहिती दिली.

## विद्युत कर्मचारी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

विद्युत कर्मचारी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १४/९/२५ वार रविवार रोजी मान्यवराच्या उपस्थितीत संपन्न झाली सभेच्या अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे अध्यक्ष श्री सुनील कुंडलिकराव वाघमारे हे होते त्यांनी पतसंस्थेचा प्रगतीचा आलेख आपल्या अध्यक्ष भाषणात मांडला तसेच पतसंस्थेची दीर्घ कर्ज मर्यादा १२ लाखावरून १५ लाख करण्याची घोषणा केली तसेच येणाऱ्या वर्षात पतसंस्थेचे सभागृह बांधकाम करण्याचा संकल्प केला या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री पी बी राख संस्थापक अध्यक्ष श्री आदेश कदम साहेब उपकार्यकारी अभियंता पाटोदा श्री शेख साहेब कनिष्ठ अभियंता श्री आर व्ही जाधव



साहेब श्री अंजान साहेब मा चेअरमन योगेश्वरी पतसंस्था अंबाजोगाई श्रीमती उषा तपसे चेअरमन वीज कामगार सहकारी पतसंस्था अंबाजोगाई श्री संजय चव्हाण सचिव श्री सांगोळे साहेब उप व्यवस्थापक धाराशिव श्री गिरी महाराज श्री सुभाष लहाने पाटील श्री अनिल काळुसे श्री गणेश दळवी श्री आबासाहेब पवळ श्री सुनील बांगर श्री तावरे साहेब श्री रमेश चौरे श्री ऋषीकेश गवळी श्री राजेंद्र जाधव श्री भागवत गोपाळघारे श्री नंदकिशोर काळे श्री वैभव नाईकनवरे श्री वांढरे साहेब श्री आजबे महाराज श्री पंकज मिसाळ श्री भालचंद्र मेंगडे श्री शेख शफिक श्री आप्पा जानोळे श्री आईलवार साहेब श्री बहीरवाल साहेब श्री बर्डे साहेब श्री नायगडे साहेब सौ मिनाबाई चव्हाण इत्यादी प्रमुख पाहुण्याच्या हस्ते दीप प्रवचन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली प्रमुख पाहुणेच्या हस्ते शालेय बक्षीस वितरण करण्यात आले तसेच सेवानिवृत्त कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला याप्रसंगी प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त केले व संस्थेच्या कामाविषयी समाधान व्यक्त केले

सभा यशस्वी करण्यासाठी संचालक मंडळ सर्वश्री प्रभाकर येडे उपाध्यक्ष श्री सतीश गोरे खजिनदार श्री प्रभु जाधवर सचिव श्री शेख जाफर श्री विठ्ठल भाकरे श्री राजू पठाण श्री शहाजी नाईकवाडे श्री हनुमंत धुमाळश्री रमेश बोबडे श्री दत्तात्रय भोंडवे श्री श्रीराम कुमरे श्री संदिपान अनपट सौ रेखा बांगर सौ दीप्ती गाडेकर श्री शेख मुजमील तज्ञ संचालक तसेच व्यवस्थापक श्री व्ही टी नाईकवाडे श्री शेख माजेद संगणक ऑपरेटर हे हजर होते. तसेच सर्वसाधारण सभेचे प्रस्ताविक संस्थेचे सचिव श्री प्रभू जाधवर यांनी त्यांच्या खास शैलीमध्ये केले व आभार प्रदर्शन श्री प्रभाकर येडे उपाध्यक्ष यांनी मानले.

## जागतिक फिजिओथेरपी दिनानिमित्त मोफत कॅम्प, जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या वतीने हेल्दी एजिंग विषयावर भर

माजलगाव । प्रतिनिधी

येथील माजलगाव विकास प्रतिष्ठान संचलित जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या वतीने जागतिक फिजिओथेरपी दिनाच्या निमित्ताने एक व्यापक मोफत फिजिओथेरपी कॅम्प आयोजित करण्यात येत आहे. या वर्षी जागतिक फिजिओथेरपी दिनाचा मुख्य विषय हेल्दी एजिंग (निरोगी वृद्धत्व) असल्याने वरिष्ठ नागरिकांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्यात येणार आहे. १५ सप्टेंबर ते २० सप्टेंबर २०२५ या कालावधीत आयोजित होणाऱ्या या कॅम्पमध्ये माजलगाव परिसरातील सर्व वयोगटातील रुग्ण सहभागी होऊ शकतात. कॉलेजच्या ओ.पी.डी विभागात सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ही सेवा उपलब्ध राहणार असून, अनुभवी फिजिओथेरपिस्ट आणि तज्ज्ञ डॉक्टरांची एक सुप्रशिक्षित टीम रुग्णांना दर्जेदार उपचार सेवा प्रदान करणार आहे.

सविस्तर वृत्त असे की, या कॅम्पमध्ये अनेक प्रकारच्या शारीरिक व्याधींवर उपचार केले जाणार आहेत, ज्यामध्ये हेमिप्लेजिया, पार्किन्सन्स रोग, सेंट्रल नर्वस सिस्टम विकार, रीढेची हाडाची समस्या, कार्डिओ थोरेसिक व्हस्क्युलर सर्जरी नंतरची समस्या, श्वासोच्छवासातील अडचण, मानदुखी, पाठदुखी, केवरदुखी, हातपायांना मुंगी येणे, गुडघे दुखणे, टाच दुखणे, सभोवतालची हाडे दुखणे, स्पॉन्डिलोसिस, व्हेरिकोस व्हेन, फेसिअल पॅरालिसिस, बेल्स प्लॅसी, फ्रोझन शोल्डर, मान दुखणेमुळे चक्कर येणे, तसेच ऑपरेशन पूर्वी आणि नंतरची मेनेजमेंट या सर्व आजारांचा समावेश आहे. विशेषतः वृद्धावस्थेतील सामान्य शारीरिक समस्यांवर तज्ज्ञांकडून योग्य मार्गदर्शन आणि उपचार पद्धती सांगितल्या जाणार आहेत, ज्यामुळे वरिष्ठ नागरिकांच्या दैनंदिन जीवनाची गुणवत्ता सुधारण्यास मदत होणार आहे.

फिजिओथेरपी उपचार पद्धतीमध्ये व्यायाम, मसाज, उष्णता उपचार आणि इतर आधुनिक शारीरिक तंत्रांचा वापर करून रुग्णांच्या शारीरिक क्षमतेत वाढ करण्यावर भर दिला जातो. या मोफत कॅम्पचा मुख्य उद्देश म्हणजे ग्रामीण भागातील लोकांना घरच्या जवळच दर्जेदार फिजिओथेरपी सेवा उपलब्ध करून देणे आणि त्यांना या उपचार पद्धतीबद्दल जागरूक करणे होय. जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, सादोळा रोड, माजलगाव येथे आयोजित या कॅम्पसाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही आणि सर्व आवश्यक उपकरणे व सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. अधिक माहितीसाठी इच्छुक नागरिक कॉलेजच्या प्रशासनाशी संपर्क साधू शकतात. या उपक्रमामुळे माजलगाव आणि परिसरातील अनेक रुग्णांना फायदा होण्याची अपेक्षा असून, विशेषतः वरिष्ठ नागरिकांना या संधीचा भरपूर उपयोग करावा असे आवाहन माजलगाव विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष मंगलाताई सोळंके यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## मला राजकीय वारसा नाही ,केवळ गोरगरीब जनता जनार्दनाच्या आशिर्वादावर पाचव्यांदा आमदार आमदार झालो -आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

२०१४ साली माझा निसटता. पराभव झाला त्याला अनेक कारणे आहेत माझा कार्यकर्ता त्यातल्या त्यात गोर गरीब कार्यकर्ते कायम माझ्याशी एकनिष्ठ राहिले मी सत्तेत असो नसो कायम माझ्याशी एकनिष्ठ राहिले काहींना भरपुर दीले तरी ते मला सोडून गेली मात्र हा हडाचा माझा गरीब कार्यकर्ता म्हणायचा आण्णा तुम्ही कोठल्याही पक्षात जा आमचा पक्षचं सुरेश धस आहे असं जीवापाड प्रेम करणारी कार्यकर्ते मला मिळाले म्हणुनचं मी यंदाच्या २०२४ /२५ विधानसभा निवडणुकीत मला पाडण्याचा भरपूर आंगदी राज्य लेवलवर प्रयत्न झाला मात्र या गोर गरीब सर्व जाती धर्माच्या बहाद्दर मतदारांनी मला साथ दीली म्हणून मी पाचव्यादा आमदार झालो असा गौरव उद्गार आमदार सुरेश आण्णा धस यांनी चिखली येथील सत्कार कार्यक्रमा मध्ये बोलत होते यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते देविदास आबा धस हे होते तर युवा नेते जयदत्त भय्या धस माजी सभापती बद्रीनाथ जगताप आष्टी नगरपंचायत चे नगराध्यक्ष जिया भाई बेग नितीन शेठ मेहेर, एडवोकेट बाळासाहेब



झांबरे, घटनेचे गणेश नाना शिंदे व्यासपीठावर उपस्थित होते.

आमचे भाचे लोकनेते सुरेश आण्णा धस हे पाचव्यादा आमदार व्हावेत म्हणून चिखली येथील विलास शिंदे व शिदे या दोन भावांनी गावातील लक्ष्मी मातेला नवस केला होता की सुरेश आण्णा आमदार झाले तर तुझ्या दरबारात पेढे तुला करु आज ते मोठ्या जवळपास ७८ आजाराच्या लीडने आमदार झाले पेढे तुला करून पुर्ण केली पुढे बोलताना धस म्हणाले की मी मतदारसंघामध्ये मोठी हरितक्रांती घडून आणणारा खुंठेफळ साठवण तलावाचा प्रकल्प अवघ्या चार महिन्यात पूर्ण करून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांच्या उपस्थितीत त्या प्रकल्पाचे लोकार्पण करणार असल्याचे त्यांनी सांगितले जनतेने मागे निवडून दिलेल्या दोन्ही आमदारांना अवघे दहा टक्के देखील या प्रकल्पाचे काम करता आले नाही मी कुठला संस्थेचा अध्यक्ष नाही किंवा मला राजकीय वारसा नाही मी केवळ जनतेच्या गोरगरीब जनतेच्या आशीर्वादाने पाचव्यांदा विधानसभेमध्ये मोठ्या मताधिक्याने गेलो आहे शेतकऱ्यांनी शेतीबरोबर दुग्ध व्यवसाय व्यवसाय करत असताना अत्याधुनिक पद्धतीचा दूध व्यवसायामध्ये वापर करावा नवीन तंत्रज्ञानाविषयी दूध व्यवसायामध्ये मोठी प्रगती झाली असून आपण देखील या तंत्रज्ञानाचा वापर करावा येणाऱ्या काही दिवसांमध्ये दुग्ध व्यवसाय संदर्भात आपल्याला नव्या तंत्रज्ञानाची माहिती मिळवावी म्हणून काही तज्ञांना मी आष्टी तालुका दूध संघाच्या वतीने आमंत्रित करणार आहे. आज माझ्या मामाच्या गावात माझी बैलगाडीतून मिरवणूक माझ्या मेव्हण्यांनी माझे केलेली पेढे तुला नवस्फूर्ती व माझे सहकारी विलास कुलकर्णी यांनी संपूर्ण गावाला उपस्थित त्यांना भोजन दिले मी आज खरोखरच भारावून गेलो आहे नक्कीच या पुढच्या काळात आपल्या गावासाठी आणखीन विकास कामे करण्याचा प्रयत्न करीन. पाऊस असताना देखील नागरिक महिला भगिनी वृद्ध तरुण कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंगत दादा शिंदे यांनी केले तर गणेश नाना शिंदे यांनी आभार मानून आमचा लोकसभेचा मराठवाडा भूषण सुरेश आण्णा धस यांच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभे राहणार आहोत अशी ग्वाही दिली.

## दिंद्रुडकरांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश ; माजलगाव मतदारसंघात संघटन बळकट!

बीड । प्रतिनिधी

हिंदुरुदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारधारेने प्रेरित होऊन तसेच उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख मा. एकनाथजी शिंदे आणि खासदार श्रीकांतजी शिंदे यांच्या विकासाभिमुख कार्यपद्धतीवर विश्वास ठेवत माजलगाव विधानसभा मतदारसंघातील दिंद्रुड गावातील अनेक कार्यकर्त्यांनी काल दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता शिवसेना मध्यवर्ती कार्यालय येथे जाहीर प्रवेश केला. या प्रवेश सोहळ्यात दीपक चोरघडे, पृथ्वीराज ठोंबरे, गणेश मायकर, श्याम शेजुळ, व्यंकट ठोंबरे, सतीश देवकर, महादेव कांबळे आणि ज्ञानेश्वर कटारे



यांचा समावेश होता. हा प्रवेश शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख स्वप्निल भैय्या गलधर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. याप्रसंगी युवासेना जिल्हाप्रमुख रविराज बडे, तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर (माऊली) गोंडे, रामदास ढगे, संदीप माने, शिवाजी गोंडे, मसुराम गोंडे यांच्यासह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिंद्रुड गावातील या कार्यकर्त्यांच्या प्रवेशामुळे माजलगाव मतदारसंघातील शिवसेनेचे संघटन अधिक सक्षम व बळकट झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत असून, नव्याने सामील झालेल्या शिवसैनिकांचे स्वागत जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख गलधर यांनी मनःपूर्वक स्वागत केले.

# उज्वल भावी पिढी घडवण्याचे सामर्थ्य शिक्षकांमध्ये -अप्पर पो.अ.सचिन पांडकर

**बीड । प्रतिनिधी**

**विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच महत्त्वाच्या मार्गदर्शनाची गरज असते, जर लहान वेळी योग्य मार्गदर्शन मिळाले तर तर तो विद्यार्थी भविष्यात नक्कीच यशस्वी होताना पाहायला मिळतो. उज्वल पिढी घडवण्याचे खरं सामर्थ्य हे शिक्षकांमध्येच आहे असे मत बीड जिल्ह्याचे अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी व्यक्त केले. बीड येथे शक्ती प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर दै. प्रजापत्राचे संपादक संजय मालानी, पुण्यनगरीचे जिल्हा प्रतिनिधी व्यंकटेश वैष्णव, माजी मुख्याध्यापिका सुनंदाताई कुलकर्णी, दै. प्रजापत्राचे निवासी संपादक समीर लव्हारे व शक्ती प्रतिष्ठानचे अध्यक्ष अक्षय केंडे उपस्थित होते.**

पुढे बोलताना अप्पर पो. अ. सचिन पांडकर म्हणाले की, शिक्षक हा समाजाचा आत्मा असतो. शिक्षकांमुळे आज एक समृद्ध भावी पिढी निर्माण होताना आपण पाहत आहोत. विद्यार्थ्यांवर शिक्षकांनी अभ्यासक्रमाबरोबरच एकात्मतेचे संस्कार करणे देखील आज गरजेचे झालेले आहे. माझ्या हस्ते शक्ती प्रतिष्ठानच्या ३१ वर्ष जुन्या असलेल्या या पुरस्कार सोहळ्याचे बक्षीस वितरण होत आहे याचा मला अभिमान वाटतो. असे म्हणत शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील अतूट नात्याबद्दलही अप्पर पो. अ. सचिन



### शक्ती प्रतिष्ठानचे आदर्श शिक्षक पुरस्काराचे थाटात वितरण

पांडकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. संजय मालानी म्हणाले की, आज समाजात आत्महत्या करण्याचे प्रमाण वाढत आहे पुढच्या पिढीला आत्महत्या पासून परावृत्त करण्यासाठी शिक्षकांनी आता प्रयत्न करणे गरजेचे आहे. आज जिल्हा आणि राज्य शासनाने शिक्षकांच्या पुरस्कारातून आदर्श हा शब्द गायब केला आहे मात्र अशा परिस्थितीतही शक्ती प्रतिष्ठानने जिल्ह्यातील आदर्श शिक्षक निवडून त्यांचा गौरव केला ही बाब कौतुकास्पद म्हणावी लागेल. वेंकटेश वैष्णव म्हणाले की, आजच्या परिस्थितीत ३१ दिवस एखादे सत्कार्य सातत्याने चालवणे कठीण झाले आहे अशी परिस्थिती पाहायला मिळते, मात्र शक्ती प्रतिष्ठानने आदर्श शिक्षकांचा सत्कार करण्याचा उपक्रम मागील ३१ वर्षांपासून चालू ठेवला आहे ही बाब खरोखरच कौतुकास्पद म्हणावी लागेल. गुरुचे स्थान हे मोलाचे मानले गेले आहे आणि त्यामुळेच प्रत्येकाच्या आयुष्यात गुरुचे महत्त्व हे अनन्य साधारण आहे. त्यामुळेच एक जागृत आणि सुसंस्कृत समाज निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम शिक्षक पार पाडत असतात. सुनंदाताई कुलकर्णी म्हणाल्या की, ज्या ज्या शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार म्हणून सन्मानित करण्यात आले आहे आणि यापूर्वी ज्यांना सन्मानित केलेले आहे ते सर्व शिक्षक आमच्यासाठी प्रेरणादायी आहेत. स्व. शक्तीकुमार केंडे यांनी शिक्षकांचा योग्य तो सन्मान व्हावा यासाठी ३१ वर्षापूर्वी ही परंपरा सुरू केली जी आजही शक्ती प्रतिष्ठान परिवाराने त्यांच्या पश्चातही सुरू ठेवली आहे. शक्ती प्रतिष्ठानने आजवरच्या शिक्षकांना सन्मानित केले त्या शिक्षकांची दखल कालांतराने महाराष्ट्र शासन आणि केंद्र सरकारने घेऊन त्यांचा सन्मान केलेला आहे. त्याचबरोबर समाजातील इतरही कर्तृत्ववान व्यक्तींचा शक्ती प्रतिष्ठानने गौरव केलेला आहे. दहा वर्षांपूर्वी शब्बीर मामू यांना शक्ती प्रतिष्ठानने गोसेवक पुरस्कार देऊन सन्मानित केले होते त्याच्या आठ वर्षानंतर भारत सरकारने शब्बीर मामा यांना पद्मश्री पुरस्कार देऊन सन्मानित केले. यावरून शक्ती प्रतिष्ठानने गौरवीत केलेले शिक्षक अथवा समाजसेवक यांची दखल वरिष्ठ पातळीवर देखील घेतले गेल्याचे दिसून येते. ३१ व्या शक्ति प्रतिष्ठानच्या आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी अमृता केंडे यांनी प्रास्ताविक केले तर दीपक बिल्पे यांनी या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी श्रीमती मंगलाताई केंडे, संजय चौसाळकर, गणेश स्वामी, लक्ष्मीकांत खडकीकर, सुहास पालीमकर, सूर्यकांत जोगदंड सर, जावळे सर, मृदुल अक्षय केंडे आदींनी परिश्रम घेतले. रेखा घोडके गुरुकुल इंग्लिश स्कूल बीड, गोदावरी सोनवणे ( जायभाये) गुरुकुल पब्लिक स्कूल बायपास बीड, सुळे आजिनाथ गहिनीनाथ मुख्याध्यापक, जि प उच्च माध्यमिक शाळा जरेवाडी ता.पाटोदा जि.बीड, उर्मिला बर्दापूरकर संस्कार विद्यालय बीड,आकाश अरुण कांबळे वसुंधरा प्राथमिक विद्यालय ता.आष्टी जि. बीड, युसुफजई नुदरतआरा खानम सुजात खान, नॅशनल उर्दू प्राथमिक शाळा इस्लामपुरा बीड, शारदा प्रदीप मुळे चंपावती माध्यमिक विद्यालय बीड.

cmyk

# महसूल विभाग गावातच करणार सातबारा दुरुस्ती; शेतकऱ्यांचा त्रास वाचणार

पुणे : तुमचा सातबारा उतारा चुकीचा आहे का? आता तालुक्याची वारी नको. महसूल विभाग घेऊन येत आहे सेवा पंधरवडा मोहीम १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान अधिकारी तुमच्या गावात येऊन सातबारा दुरुस्ती करतील. शेतकऱ्यांसाठी ही सोन्याची संधी, अद्ययावत उतारा घरबसल्या मिळेल. या मोहिमेत महसूल अधिकारी थेट गावात जाऊन शेतकऱ्यांचे सातबारा उतारे (७/१२ ) तपासून दुरुस्त करणार आहेत. यामुळे तालुक्याच्या वाऱ्या न करता शेतकऱ्यांना गावातच अद्ययावत नोंदी मिळणार आहेत.

मोहिमेचे उद्दिष्ट :सातबारामधील चुका, प्रलंबित अर्ज आणि नोंदणी पत्रकातील त्रुटी यांचा गावपातळीवर निपटारा करणे. महसूल विभागाच्या सेवांचा लाभ नागरिकांच्या दारी पोहोचविणे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १५५ नुसार आदेशांची तपासणी करून सातबारात सुधारणा करणे.

मोहिमेची कालमर्यादा : १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत महसूल विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी गावोगाव भेट देऊन शेतकऱ्यांकडून अर्ज स्वीकारतील, तक्रारी ऐकून त्यावर त्वरित कार्यवाही करतील.



शेतकऱ्यांना मिळणारे फायदे : तालुक्याच्या कार्यालयात चकरा मारण्याची गरज नाही. चुकीच्या नोंदी, गहाळ माहिती आणि प्रलंबित अर्ज गावातच सोडवले जातील. अद्ययावत ७/१२ उतारा थेट गावात उपलब्ध होणार. प्रलंबित प्रकरणे जलदगतीने निकाली निघतील.

शेतकऱ्यांसाठी सूचना : आपल्या जमिनीशी संबंधित सर्व मूळ कागदपत्रे (हक्कपत्र, जुने सातबारा, खरेदीखत इ.) जवळ ठेवा. मोहिमेदरम्यान गावात महसूल अधिकारी आल्यावर तक्रारी, अर्ज तत्काळ सादर करा. दुरुस्ती झाल्यानंतर मिळालेला सातबारा उतारा नीट तपासा आणि नोंदी अचूक आहेत का ते पहा. राज्यातील शेतकऱ्यांना सातबारा उताऱ्याच्या त्रुटीमुळे अनेकदा अडचणींचा सामना करावा लागतो. महसूल विभागाची ही सेवा पंधरवडा मोहीम त्या समस्या सोडवण्यासाठी महत्त्वाची पायरी ठरणार आहे. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान गावात येणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांशी संपर्क साधून सातबारा दुरुस्तीची संधी नक्की घ्यावी.

आवश्यक कागदपत्रांची यादी : अर्जाचा नमुना (महसूल विभागाकडून मिळणारा साधा अर्ज किंवा ऑनलाईन फॉर्म). जमिनीचा जुना सातबारा उतारा (जर उपलब्ध असेल तर). हक्कपत्र / खरेदीखत / विक्रीखत (जमीन खरेदी-विक्री संबंधित कागदपत्रे). नोंदणी कार्यालयातील नोंद. वारस प्रमाणपत्र / ८ उतारा (जर वारसा नोंद करायची असेल तर). जमिनीचा फेरफार अर्जची प्रत आधी केलेल्या फेरफार क्रमांकासह. ओळखपत्र: आधार कार्ड / पॅन कार्ड / मतदार ओळखपत्र (अर्जदाराचे). रहिवासी दाखला (जमिनीचा मालक त्या गावचा रहिवासी असल्याचा पुरावा). पावती / शुल्क भरल्याची पावती (जरी शुल्क लागू असेल तर). कोर्टाचा आदेश / तहसीलदाराचा आदेश (जर काही वादग्रस्त नोंदी दुरुस्त करायच्या असतील तर).

## डांगी गाय शेतकऱ्यांसाठी फायदेशीर



शेतकरी बांधवांकडे त्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी अनेक प्रकारचे उत्तम प्राणी आहेत, ज्यामुळे त्यांना दर महिन्याला चांगले उत्पन्न मिळू शकते. डांगी गाय, जी आजच्या काळात इतर प्राण्यांपेक्षा जास्त नफा कमावते. भारतीय बाजारपेठेतही त्याची मागणी सर्वाधिक ही गाय मूळ जातीची डांगी आहे, जी गुजरातमधील डांग, महाराष्ट्रातील ठाणे, नाशिक, अहमदनगर आणि हरियाणातील कर्नाल आणि रोहतकमध्ये अधिक आढळते.


ही गाय वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या नावांनी ओळखली जाते. उदाहरणार्थ, गुजरातमध्ये ही गाय डांग म्हणून ओळखली जाते. ही गाय इतर प्राण्यांच्या तुलनेत अधिक वेगाने काम करते, असे शेतकरी व पशुपालकांचे म्हणणे आहे. याशिवाय ही गुरे अतिशय शांत आणि शक्तिशाली असतात. या देशी गायीची सरासरी दूध काढण्याची क्षमता एका बायंटमध्ये सुमारे ४३० लिटर दूध देते आणि दुसरीकडे डांगी गायीची काळजी घेतल्यास सुमारे ८०० लिटरपर्यंत दूध मिळू शकते. जर तुम्हाला ही गाय ओळखता येत नसेल तर घाबरू नका, यासाठी तुम्हाला काही गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतील. डांगी गायीची सरासरी उंची ११३ सेमी असते आणि या जातीच्या बैलाची उंची ११७ सेमी पर्यंत असते. त्यांचा रंग पांढरा असून त्यांच्या शरीरावर लाल किंवा काळे डाग दिसतील. दुसरीकडे, जर आपण त्यांच्या शिंगांबद्दल बोललो, तर त्यांची शिंगे लहान आहेत, म्हणजे १२ ते १५ सेमी आणि टोकदार टोकांसह जाड. डांगी गाईची कातडी पाहिल्यास ती अतिशय चमकदार आणि मऊ असते. त्याच्या त्वचेवर भरपूर केस आहेत. त्यांचे कान आकाराने लहान असून ते आतून काळ्या रंगाचे असतात.

## संकरित भेंडीच्या लागवडीस अनुकूल जाती

अर्का निकिता जीएमएस आधारित भेंडीचा पहिला संकरित वाण आहे जो भारत आणि जगातील सार्वजनिक संस्थांनी विकसित केला आहे. ही भेंडीची संकरित जात २०१७ मध्ये व्हिटीआयसी संस्थेने शोधून प्रसारित केलेली आहे.

लवकर फुलधारणा होणाऱ्या या जातीत फुले येण्यासाठी ३९ दिवस आणि फळे येण्यासाठी ४३ दिवस लागतात. या जातीची फळे गडद हिरवी, मध्यम, गुळगुळीत आणि कोवळी असतात. या जातीत पौष्टिकदृष्ट्या जास्त अँटिऑक्सिडेंट आणि उच्च दर्ज्याचे फायबर (८.८५%) असतात. यात पोटॅशियम ३.७%, कॅल्शियम ९९७ /१०० ग्रॅम सारखे खनिजे आहेत. ही जात १२५-१३० दिवसांच्या कालावधीत तोडणीला तयार होत असून उत्पादन २१-२४ टन मिळते. अर्का निकिता ही भेंडीची जात उच्च उत्पादकता आणि शेतीसाठी अनुकूलता यासाठी ओळखली जाते. पारंपारिक शेती पद्धतींसह आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची जोड याद्वारे या जातीचे लक्षणीय उत्पादन घेता येते. अर्का निकिता ही भेंडीची जात तिच्यातील अपवादात्मक गुणधर्मांसाठी ओळखली जाते जसे, उच्च उत्पन्न, रोग प्रतिकारशक्ती आणि विविध हंगामात आणि प्रदेशांमध्ये लागवडीस अनुकूलता.

अर्का निकीता भेंडीची प्रमुख



वैशिष्ट्ये : उच्च उत्पादन - अर्का निकिता प्रति हेक्टर २१-२४ टन इतके प्रभावी उत्पादन देते. या उच्च उत्पादकतेमुळे शेतकर्यांसाठी जास्तीत जास्त नफा मिळवण्यासाठी एक चांगली निवड ठरते. फळांची गुणवत्ता - या संकरीत भेंडीची फळे गडद हिरवी, गुळगुळीत पाच कड्यांची असतात. यामुळे ही भेंडी दिसायला आकर्षक तर आहेच शिवाय काढणीस सोपी आहे. कोवळी फळे यामुळे या जातीला बाजारभाव सुद्धा चांगला मिळतो. अनुकूलता - अर्का निकिता विविध प्रकारच्या परिस्थितीत लागवडीसाठी योग्य आहे. या जातीची खरीप (पावसाळा) आणि रब्बी (हिवाळा) दोन्ही हंगामात लागवड करता येते.

ही जात कर्नाटक, आंध्र प्रदेश, बिहार, ओरिसा, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, हरियाणा, महाराष्ट्र आणि अंदमान आणि निकोबार बेटांसह संपूर्ण भारतातील प्रमुख भेंडी-उत्पादक प्रदेशांसाठी अनुकूल आहे. रोग सहनशील - ही संकरित जात भेंडी पिकातील हानिकारक यलो व्हेन मोझॅक व्हायरस या रोगास सहनशील आहे. त्यामुळे पिकाच्या उत्पादनात वाढ होऊन दर्जा सुद्धा वाढतो.

## गंधक, कॅल्शिअम, मॅग्नेशिअममुळे वाढते पिकाचे आयुष्य

जमिनीत गंधक या अन्नद्रव्याची साखळी ही नत्र अन्नद्रव्याच्या साखळी प्रमाणेच असते. जसे, की दोन्ही अन्नद्रव्यांची उपलब्धता ही सेंद्रिय घटकाचे प्रमाण आणि उपयुक्त जीवाणूंच्या संख्येवर अवलंबून असते. असे असले तरी कॅल्शिअम आणि मॅग्नेशिअम या दोन अन्नद्रव्यांची उपलब्धता ही पालाश प्रमाणेच मातीतील चिकण मातीच्या कणांच्या प्रमाणावर अवलंबून असते. पिकांसाठी आवश्यक असलेल्या अन्नद्रव्यांमध्ये कॅल्शिअम हे अन्नद्रव्य सर्वांत जास्त प्रमाणात जमिनीत उपलब्ध स्वरूपात आढळते. पिकांमध्ये कॅल्शिअमचे सर्वसाधारण प्रमाण ०.२ ते १.० टक्के असते. हे अन्नद्रव्य जिप्समचा महत्त्वाचा घटक आहे. जिप्समचा वापर केल्यामुळे पिकांस कॅल्शिअमचा पुरवठा होतो, त्याचबरोबर अधिकच्या सोडिअम, ॲल्युमिनिअम आणि हायड्रोजन या धन अयनांमुळे बिघडलेल्या जमिनीची परिस्थिती सुधारण्यात मदत होते.

कॅल्शिअम : हे कॅल्शिअम पेक्टेटच्या स्वरूपात पेशींच्या बाह्यआवरणाचा महत्त्वाचा घटक असल्यामुळे पेशींच्या बळकटीकरणासाठी आवश्यक असते. शेंडा, मुळांची वाढ होण्यासाठी कॅल्शिअम महत्त्वाचे आहे. जमिनीचा कमी सामू, आयन असंतुलन आणि ॲल्युमिनिअमच्या अधिक प्रमाणामुळे होणाऱ्या नुकसानीपासून पिकांच्या मुळांचे संरक्षण करते. जमिनीमध्ये असणारे विविध आम्ले उदा. फॉस्फोरीक आम्ल, सेंद्रिय आम्ल (सायट्रिक, मॅलिक, ऑक्झेलिक इ.) उदासीन करण्यासाठी तसेच मुळांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक असते. पेशी विभाजन आणि गुणसूत्रांची घडण टिकविण्यासाठी महत्त्वाचे आहे. कॅल्शिअमचे वहन एका भागामधून दुसरीकडे होत नाही, त्यामुळे



कमतरतेची लक्षणे सुरूवातीस शेंड्याकडील कोवळ्या भागाकडे दिसून येतात. मुळांची वाढ खुंटते, मुळांची टोके गडद रंगाची होतात, मर होते.शेंड्याकडील कोवळी पाने वेडीवाकडी होतात, आकाराने लहान राहतात, पिवळी पडतात. पाने सुरकुततात, पानांची देठ मोडतात, खोड कमकुवत होते.गंधक : पिकांच्या मुळाव्दारे गंधक अन्नद्रव्य सल्फेट या स्वरूपात शोषले जाते. अभ्यासावरून असेही दिसून आले आहे की पिकांच्या पानांव्दारे ही गंधक सल्फेट स्वरूपात शोषले जाते. निरोगी पिकांमध्ये गंधकाचे प्रमाण ०.१ ते ०.४ टक्के या प्रमाणात आढळते. गंधक हे नत्र, स्फुरद आणि पालाश नंतरचे चौथे सर्वात कमतरता असलेले अन्नद्रव्य आहे. विशेषत: जास्त निचऱ्याच्या, उथळ व तेलबियांवर आधारीत पीक पद्धती असलेल्या जमिनींमध्ये गंधकाची कमतरता आढळते. गंधकाला पीक गुणवत्ता सुधरविणारे अन्नद्रव्य म्हणतात. गंधकयुक्त आमिनो आम्लांच्या (सिस्टीन, सिस्टाईन, मिथेओनाईन) निर्मितीसाठी आवश्यक आहे. तेलबियांमध्ये तेलाचे प्रमाण वाढविण्यासाठी गंधक आवश्यक आहे. पिकांमधील विकर (कोएन्झाईम-अे) स्निग्ध आम्ले, अमिनो आम्ल, सायट्रिक आम्लचक्र आदींमध्ये महत्त्वाचे आहे. संश्लेषण क्रियेव्दारे कर्बोदके निर्मितीसाठी आवश्यक हिरवे रंगद्रव्य तयार होण्यासाठी आवश्यक आहे. पिकांच्या मुळांवरील गाठीमध्ये नत्राचे स्थिरीकरण करण्यासाठी आवश्यक आहे. पिकांमध्ये गंधकाचे प्रमाण ०.१ ते ०.२ टक्यांपेक्षा कमी असल्यास कमतरतेची लक्षणे दिसून येतात. यासाठी जमिनीमध्ये शिफारशी प्रमाणे सेंद्रिय खतांचा वापर करावा.

मॅग्नेशिअम : निरोगी पिकांमध्ये मॅग्नेशिअमचे प्रमाण ०.१ ते ०.८ टक्के असते. हे अन्नद्रव्य क्लोरीफिल रंगद्रव्याच्या मध्यभागी असते. पीक वाढीसाठी महत्त्वाचे अन्नद्रव्य आहे. मॅग्नेशिअम-पोरफायरीनच्या स्वरूपात क्लोरीफील या रंगद्रव्याचा महत्त्वाचा घटक आहे.याच्या सहभागाशिवाय क्लोरोफील रंगद्रव्यास सूर्यप्रकाशाचा उपयोग ऊर्जानिर्मिती व पिष्टमय पदार्थ तयार करण्यासाठी करता येत नाही. हे अन्नद्रव्ये विविध विकरांना (रायबुलोबायोफॉस्फेट, कार्बोक्सिलेज, फॉस्फोइनोल पायरुवेट, कार्बोक्सिनेज) क्रियाशील करते. यामुळे पानांमध्ये कर्बाचे स्थिरीकरण होण्यास मदत होते.

प्रथिने तयार करण्यासाठी आवश्यक घटक. रायझोबियमच्या घडणीमध्ये महत्त्वाचे असल्यामुळे, या अन्नद्रव्याचे प्रमाण कमी असल्यास पीक आपला सर्वसाधारण कालावधीपेक्षा आपला जीवनक्रम लवकर पूर्ण करते. योग्य प्रमाणामुळे स्फुरदाचे शोषण, वहन आणि साखरेचे वहन चांगल्या प्रकारे होते. या अन्नद्रव्याचे वहन एका भागांकडून दुसऱ्या भागांकडे होते, त्यामुळे कमतरतेची लक्षणे जुन्या पक्व पानांवर दिसून येतात. प्रमाण ०.१ टक्यांपेक्षा कमी असल्यास कमतरतेची लक्षणे दिसून येतात. पानांचा शिरांमधील भाग पिवळा होतो, शिरा हिरव्या रंगाच्या राहतात. पाने लहान आकाराची होतात व कडा वरील बाजूने दुमडतात. तपकिरी होऊन करपून जातात. यासाठी सेंद्रिय खतांचा वापर करावा. शिफारशीप्रमाणे मॅग्नेशिअम सल्फेट (३० ते ३५ किलो प्रति हेक्टरी) जमिनीतून द्यावे. विद्राव्य खते उदा. चिलेटेड मॅग्नेशिअम, मॅग्नेशिअम नायट्रेट ०.५ टक्के फवारणीद्वारे द्यावीत.




### जागतिक दिवस: हिंदी दिवस

### महत्वाच्या घटना

७८६ : हरुन अल रशिद बगदादचा खलिफा झाला.
१८९३ : सरदार खाजवीवाले, श्री. गणपतराव घोटवडेकर व भाऊ रंगारी यांनी पुण्यात पहिल्यांदा सार्वजनिक गणपती बसवले. लोकमान्य टिळकांनी हा उपक्रम उचलून धरून त्याला राष्ट्रीय उत्सवाचे स्वरुप दिले. हीच सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरूवात होय.
१९१७ : रशियाने स्वत:ला प्रजासत्ताक घोषित केले.
१९४८ : दोन तासांच्या चकमकीनंतर भारतीय सैन्याने दौलताबादचा किल्ला जिंकून घेतला. देवगिरीच्या यादवांचे साम्राज्य नष्ट झाल्यानंतर सुमारे साडे सहाशे वर्षांनी स्वतंत्र झालेल्या किल्ल्यात भारतमातेचे मंदिर उभारण्यात आले.
१९४९ : हिंदी हि भारताची राष्ट्रभाषा म्हणून घोषित करून हिंदी दिन साजरा केला.
१९५९ : सोव्हियेत संघाचे लुना २ हे अंतरिक्षयान चंद्रावर कोसळले. चंद्रापर्यंत पोचणारी ही पहिली मानवनिर्मित वस्तू होती.
१९६० : ऑर्गनायझेशन ऑफ द पेट्रोलियम एक्स्पोर्टिंग कन्ट्रीज' ची स्थापना झाली.
१९७८ : 'व्हेनेरा-२' हे रशियाचे अंतराळयान शुक्राकडे झेपावले.
१९९५ : संगीतकार दत्ता डावजेकर यांना महाराष्ट्र सरकारचा 'गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार' जाहीर
१९९९ : किरिबाटी, नौरू व टोंगा या राष्ट्रांचा संयुक्त राष्ट्रांमध्ये प्रवेश.
२००० : मायक्रोसॉफ्ट कंपनी ने विंडोज एमई रिलीज केले.
२००३ : इस्टोनियाच्या जनतेने जनमत चाचणीत युरोपीय संघात सामील होण्यासाठीचा कौल दिला.
२०१५ : गुरुत्वीय लहरी गुरुत्वीय लहरींचे पहिले निरीक्षण करण्यात आले.
२०१७ : पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जपानचे पंतप्रधान शिंजो आबे यांनी आज संयुक्तपणे भारताच्या पहिल्या हाय-स्पीड रेल्वे प्रकल्पाची पायाभरणी केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७१३ : योहान कीज जर्मन गणितज्ञ व खगोलशास्त्रज्ञ (मृत्यू: २९ जुलै १७८१)
१७७४ : भारतातील वे१४ राज्यपाल जनरल लॉर्ड विलियम बेंटीक यांचा जन्म. (मृत्यू: १७ जून १८३९)
१८६७ : विष्णू नरसिंह जोग वारकरी शिक्षणसंस्थेचे संस्थापक, कीर्तनकार, प्रवचनकार आणि लेखक (मृत्यू: ५ फेब्रुवारी १९२०)
१८९७ : पार्श्वनाथ आळतेकर नट, दिग्दर्शक व नाट्यशिक्षक (मृत्यू: २२ नोव्हेंबर १९५७)
१८९८ : महाराष्ट्रीयन मराठी नाट्य-चित्र अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते, नाट्यसंस्था स्थापक पार्श्वनाथ आळतेकर यांचा जन्मदिन.
१९०१ : यमुनाबाई हिर्लेकर शिक्षणतज्ञ व विचारवंत (मृत्यू:)
१९१४ : भारतीय हिंदी चित्रपत सृष्टीतील सुप्रसिद्ध चित्रपट निर्माता आणि दिग्दर्शक जी. पी. सिप्पी यांचा जन्मदिन.
१९२१ : दर्शनसिंहजी महाराज शिख संतकवी, 'मंजील-ए-नूर' आणि 'मता-ए-नूर' या ऊर्दू कवितासंग्रहांबद्दल त्यांना ऊद्रू अकादमीचे पुरस्कार मिळाले. (मृत्यू: ३० मे १९८९)
१९२३ : राम जेठमलानी केन्द्रीय कायदामंत्री, कायदेपंडीत, प्रसिद्ध भारतीय राजकारणी व कायदेपंडित तसचं, माजी भारतीय बार कौन्सिलचे अध्यक्ष आणि सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्ष
१९३२ : डॉ. काशिनाथ घाणेकर मराठी रंगभूमी आणि चित्रपटातील अभिनेते (मृत्यू: २ मार्च १९८६)
१९४८ : वीणा सहस्रबुद्धे प्रख्यात भारतीय ग्वाल्हेर व जयपूर येथील किराणा घराण्यातील हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील गायक व संगीतकार
१९५७ : केपलर वेसेल्स दक्षिण अफ्रिकेचा क्रिकेटखेळाडू
१९६३ : रविंद्र रामनारायण ऊर्फ 'रॉबिन' सिंग अष्ट्पैलू क्रिकेटपटू व प्रशिक्षक

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

८९१ : पोप स्टीफन (पाचवा) (जन्म: )
१९०१ : अमेरिकेचे वे२५ राष्ट्राध्यक्ष विल्यम मॅकिन्ले यांचे निधन. (जन्म: २९ जानेवारी १८४३)
१९७१ : ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित भारतीय बंगाली भाषिक कादंबरीकार, लेखक व साहित्यकार ताराशंकर बंद्योपाध्याय यांचे निधन.
१९७९ : नूर मोहम्मद तराकी अफगणिस्तानचे तिसरे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १५ जुलै १९१७)
१९८५ : भारतीय हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध संगीतकार रामकृष्ण शिंदे यांचे निधन.
१९८९ : बेन्जामिन पिअरी पाल आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भारतीय कृषी संशोधक, पद्मश्री (१९५८), पद्मभूषण (१९६८), इंडीयन कौन्सिल ऑफ ॲग्रीकल्चरल रिसर्च () चे पहिले संचालक, तांबेरा रोगाला दाद न देणार्या व अधिक उत्पादन देणार्या गव्हाच्या जाती त्यांनी शोधून काढल्या. (जन्म: २६ मे १९०६)
१९९८ : प्रा. राम जोशी शिक्षणतज्ञ व मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म:)
२०११ : हरिश्चंद्र बिराजदार कुस्तीगीर व प्रशिक्षक (जन्म: ५ जून १९५०) ध्यानचंद पुरस्कार सन्मानित भारतीय कुस्तीगीर व प्रशिक्षक
२०१५ : सबवे चे सहसंस्थापक फ्रेड डेलुका यांचे निधन. (जन्म: ३ ऑक्टोबर १९४७)

सोमवार दि.१५ सप्टेंबर २०२५ ५

राज्य लोकतंत्र

अहिल्यानगर-जालना







# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक संदर्भात जिल्हा कॉँग्रेस कमिटीची आढावा बैठक

जालना। प्रतिनिधी

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक निमित्त जालना जिल्हा कांग्रेस कमेटीच्या प्रमुख पदाधिकारी यांची जिल्हा आढावा बैठक नवनियुक्त जालना जिल्हा प्रभारी अशोक शिवाजीराव पाटील निलंगेकर व खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांच्या अध्यक्षतेत व जालना जिल्ह्यातील पाच विधानसभचे नवनियुक्त निरीक्षक ॲड. सैयद अकरम, रविंद्र काळे, अशोक डोळस, गणेश राउत, समद पटेल, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, प्रदेश उपाध्यक्ष कल्याण दळे, प्रदेश उपाध्यक्ष बदर चाउस, अनवर बापू देशमुख, अविनाश चव्हाण यांच्या विशेष उपस्थितित मधुर बैंक्वेट हॉल, नवीन जालना येथे संपन्न झाली.




नवनियुक्त जालना जिल्ह्याचे प्रभारी अशोक पाटील निलंगेकर यानी बैठकित आगामी स्थानिक स्वराज्य संस्था डोळ्यासमोर ठेवुन पदाधिकारी यांनी संगठन रचना व बुथ कमिटया बळकटी करण्यास प्राधान्य देणे तसेच पक्षाच्या विचारधारेला तळागाळापर्यंत पोहोचवणे असे आव्हान पदाधिकारी यांना केले. खासदार डॉ.कल्याण काळे यांनी पक्ष संगठन मजबूतीकरण, प्रभाग निहाय शाखा स्थापना व प्रभाग निहाय बैठका घेण्याच्या सुचना दिल्या व आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत विजय प्राप्तिसाठी खंभीरपने मी आपल्या पाठीशी उभा आहे असे सांगितले. जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी आपल्या संबोधनात आगामी स्थानिक संस्था निवडणूक या पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे भविष्य घडवणाऱ्या आहेत. पदाधिकारी यांनी संगठन, रचना व बुथ कमिटया गठित करावे तसेच प्रभाग निहाय शाखा स्थापना कराव्या. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत विजय प्राप्तिसाठी पक्ष संगठन आपल्या पाठीशी खंबीरपने उभा राहिल अशी ग्वाही दिली.

काँग्रेसच्या इतिहासात सर्वात मोठी यात्रा राहुल गांधींनी केली. देशातल्या बहुतांश भागातून ते फिरले यापासुन युवा पदाधिकारी यांनी प्रेरणा घ्यावी व देशाच्या एकता, अखंडता व विकासासाठी पक्ष संगठन बळकटी करणात आपले योगदान द्यावे. यावेळी ॲड. राम कुरहाड़े, माझी सभापती अब्दुल रऊफ, विजय चौधरी, संजय मुथा, आरिफ शेख, युवा जिल्हाध्यक्ष राहुल देशमुख, सेवा दलाचे अध्यक्ष इब्राहिम शेख, महिला अध्यक्ष नंदा पवार, ज्ञानेश्वर भांदरगे, अंकुश रावत, इकबाल कुरैशी, युवा शहराध्यक्ष वसीम शेख, नवाब डांगे, बासित कुरैशी, इरशाद शेख, करीम बिल्डर, कृष्णा पडुल, कलीम खान, अजय बनकर, अब्दुल हमीद, कल्याण तारडे, मोइज अंसारी, लक्ष्मण मसलेकर, इमरान खान, विनोद यादव, श्रीरंग कामटे, आकाश भाऊ, अशोक उबाले, नारायण वाडेकर, सूरज यालगनवार, अमोल भोसले, प्रमोद अल्हाट, विशाल धानुरे, फकीरा वाघ, बद्री उफ़रे, सुभाष कामले, प्रभाकर मामा, प्रल्हाद जाधव, मनोहर उघड़े, मोहम्मद सेठ, अमजद खान, सय्यद अजहर, शेख वसीम, वसीम कुरैशी, सय्यद रहीम तांबोली, आसिफ अंसारी, अरशद शेख, वसीम खान, मजहर सौदागर, अब्दुल रज्जाक, जावेद कुरेशी, युनुस शेख, सचिन कचरे, जावेद बेग, अनस चाउस, गणेश चंदोडे, इरशाद शेख, किसन जेठे, सलीम काजी, मोबिन खान, सोपान तिडख, माउली दुकरे, माउली इंगोले, लाला पाटिल, मोहन जाधव, जयसिंग पोखड़, मुखीब कुरेशी, जीतूभाई तोड़ावत, नानाभाऊ महसलेकर, अनवर शेख, जावेद बागवान, भरत अंभोरे, ज्ञानेश्वर शिंदे, पंकज लोखंडे, प्रमोद फदाट, मुरलीधर भोपले, सुनिल गाड़ेकर, सुरेश गवाई, अब्दुल सतार शेख, सलीम शेख, आबासाहेब काकडे, दिलीपराव चव्हाण, लक्ष्मणराव बोम्बले, जावेद पटेल, डॉ. जगन्नाथ वैराल इरफान सिद्दीकी, त्रिम्बक तिरुखे, सलीम काजी, एजाज पठान, गुड्डू पत्रकार, विश्वास बाघ, रमेश जाधव व माठया संखेने पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष अतिक खान यांनी केले.

# गुन्हे शाखा, दहशतवाद विरोधी पथकाने अधिक प्रभावी कारवाई करावी -मिश्रा

## पोलीस महानिरीक्षक मिश्रा यांनी केले जिल्हा पोलीस प्रशासनाचे कौतुक



जालना। प्रतिनिधी

दहशतवाद विरोधी पथक आणि स्थानिक गुन्हे शाखेने जिल्ह्यात अंमली पदार्थांसह अवैध धंद्याच्या विरोधात अधिक प्रवाभीपणे काराव्या कराव्यात, अशा शब्दात विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र यांनी जिल्हा पोलिसांना सूचना दिल्या. तसेच जालना जिल्हा पोलीस प्रशासन आंदोल, मोर्चे तसेच गुटखा माफियावर कारवाई, लुटमार, चोरी अशा इतर धडाकेबाज कारवाया केल्यामुळे पोलीस महानिरीक्षक मिश्रा यांनी जालना जिल्हा पोलीस प्रशासन कौतुक केले.

जालना जिल्हा पोलीस दलाच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी मिश्रा हे जालना दौऱ्यावर आले असता त्यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयात आढावा बैठक घेतली. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रारंभी मिश्रा यांनी मराठा आंदोलन उत्कृष्टरीत्या हाताळल्याबद्दल आणि गणेशोत्सव व इतर सण शांततेत साजरे करण्यासाठी प्रयत्न केल्याने पोलीस अधीक्षक व अप्पर पोलीस अधीक्षक यांच्यासह पोलीस अधिकाऱ्यांचा प्रमाणपत्र देवून गौरव केला. यावेळी त्यांनी खून, खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, वाहन चोरी यासह प्रलंबीत गुन्ह्यांचा आढावा घेवून गुन्हे लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी अधिक चांगल्या प्रकारे काम करावे, असे सांगितले. तसेच एनडीपीएस विशेष पथकाची स्थापना करण्यात आली असून, त्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या ७८४३०५१०२६ या मोबाईल क्रमांकाचा जनतेने जास्तीत जास्त वापर करावा, असे आवाहन केले. उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांसह प्रभारी अधिकाऱ्यांनी ग्रामीण भागात अधिकाधिक गावांना भेट देवून गरज असेल तेथे कॅमेरे लावण्याबाबत जगनाजगृती करावी आणि नविन कायद्याची अंमलबजावणी करतांना दोषसिध्दीचे प्रमाण वाढवावे, असे निर्देशही त्यांनी दिले. यावेळी त्यांच्या हस्ते नागरिकांसाठी आधार कार्ड, पॅनकार्ड, वाहन परवाना व इतर कागदपत्रे गहाळ झाल्यानंतर त्याची तक्रार नोंदविण्यासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या ॲपचे अनावरण करण्यात आले. तसेच २५ स्कॅनर, २१ मोबाईल टॅब, ४ संगणक, १ टॅपटॉपचे पोलिसांना वितरण करण्यात आले. यावेळी विभागीय पोलीस अधिकारी व सर्व पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांच्यासह जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# डेंग्यू मुक्त नगरसाठी विद्यार्थ्यांनी स्वच्छता दूत म्हणून काम करावे

## आयुक्त डांगे यांचे आवाहन, दातरंगे मळ्यात डेंग्यू मुक्त अभियान



अहिल्यानगर । प्रतिनिधी

मनपातर्फे शहरात डेंग्यू मुक्त अभियान सुरू आहे.१४ आठवड्यांत १५ हजार ४१८ घरांची तपासणी केली. ४० हजार ९२७ पाणीसाठे तपासले. यात ६३७ पाणी साठ्यात अळ्या आढळल्या. ते पाणीसाठे नष्ट केले. या परिसरात षध फवारणी व नागरिकांच्या आरोग्याची तपासणी केली आहे. मागील वर्षात सप्टेंबरपर्यंत ५४ डेंग्यूचे रुग्ण शहरात आढळले होते. यावर्षी १० रुग्ण आढळले. डेंग्यू मुक्त अभियान नागरिकांच्या घरापर्यंत पोहोचले असल्यामुळे जनजागृती झाली आहे. डेंग्यू रुग्णांची संख्या कमी झाली आहे. भविष्यात डेंग्यू मुक्त अहिल्यानगर निर्माण करायचे आहे शहरातील विद्यार्थ्यांनी पुढे येऊन स्वच्छता दूत म्हणून काम करावे, असे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले.

अहिल्यानगर महानगरपालिका व स्व.हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना यांच्या वतीने दातरंगे मळा परिसरात डेंग्यू मुक्त अभियान झाले. आयुक्त डांगे यांनी पाणीसाठ्याची तपासणी केली. यावेळी उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे, माजी नगरसेवक सचिन शिंदे, श्यामआप्पा नळकांडे, प्रा. अरविंद शिंदे, संदीप दातरंगे, प्रभाग अधिकारी राकेश कोतकर, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, डॉ. दिलीप बागल, डॉ. सृष्टी बनसोडे, डॉ. ऐश्वर्या दळवी, मुख्याध्यापिका वसुधा जोशी, शारदा हौसिंग, शपाकत सय्यद उपस्थित होते. श्यामआप्पा नळकांडे म्हणाले, डेंग्युचा छोटासा डास मनुष्याला मृत्यूपर्यंत घेऊन जाऊ शकतो, त्यासाठी नागरिकांनी पाणीसाठे तपासावी तसेच साठवून ठेवलेल्या पाण्यामध्ये गप्पी मासे सोडावीत नागरिकांनी आठवड्यातून एक दिवस स्वच्छता मोहीम राबवून आपले घर व परिसर स्वच्छ ठेवावे आयुक्त यशवंत डांगे यांनी सुरू केलेले डेंग्यू मुक्त अभियान कौतुकास्पद आहे यामुळे नागरिकांमध्ये जनजागृती होत आहे. यावेळी माजी नगरसेवक अरविंद शिंदे यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ.सृष्टी बनसोडे यांनी, तर आभार आरोग्य अधिकारी डॉ.सतीश राजुरकर यांनी मानले. पथनाट्यद्वारे डेंग्यूबाबत विद्यार्थिनींची जनजागृती समर्थ शाळेच्या विद्यार्थिनींनी पथनाट्यद्वारे डेंग्यू आजाराबाबत जनजागृती केली तसेच आशा सेविकांनी भारुड सादर केले. सिस्टर यांनी अभंगाद्वारे डेंग्यू आजाराबाबत जनजागृती केली. आरोग्यबाबत आलेल्या निबंध स्पर्धेचे पारितोषिक वितरण यावेळी करण्यात आले.

# समर्थ सहकारी बँकेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

अंबड । प्रतिनिधी

समर्थ सहकारी बँकेची २६ वी वार्षीक सर्वसाधारण सभा,झवर मंगल कार्यालय,अंबड येथे संपन्न झाली.याप्रसंगी बँकेचे संस्थापक अध्यक्ष व प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी मंत्री राजेश टोपे उपस्थित होते.

यावेळी त्यांनी समर्थ सहकारी बँकेच्या मागील आर्थिक वर्षातील प्रगती,भविष्यातील वाटचाल व उद्दिष्ट या संबंधी बँकेच्या सभासदांशी संवाद साधला. विशेषत: याप्रसंगी उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांसाठी त्यांनी को - २६५ उसाची जात वगळून इतर सर्व ऊस पिकासाठी एकरी ३० हजार ऐवजी ५० हजार रुपये कर्ज देण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या ऊस उत्पादनासाठी ठिबक सिंचन व तंत्रज्ञानचा वापर केल्यास यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या ७०% कर्ज बँक उपलब्ध करुन देणार असून त्यासाठी बँकेने २० कोटी रुपयांची स्वतंत्र व्यवस्था केल्याचे देखील त्यांनी सांगितले. पुढे बोलतांना मा.राजेश टोपे म्हणाले की, समर्थ सहकारी बँकेतून आता सोने तारण कर्ज अधिक,सुलभ,कमी व्याजदरात,सुरक्षित व जलद (एका तासात) देण्यात येणार आहे.तसेच बँकेच्या नवीन शाखांचा विस्तार करण्यात येऊन बँक व्यवसाय वाढवीला जाणार आहे.सभासदांचे हित, ठेवीदारांच्या ठेवीची सुरक्षिता आणि उत्कृष्ट ग्राहक सेवा यासाठी बँक कायम सेवेत राहणार असून बँकींक क्षेत्रातल्या सर्व अत्याआधुनिक सोयीसुविधा,यांत्रिकरण व तंत्रज्ञान यासाठी समर्थ बँक कायम पुढे रहाणार असल्याचे हे त्यांनी नमुद केले.तसेच नम्रतापूर्वक सेवा व सन्मानपूर्वक सेवा देणारा कर्मचारी हे या बँकेचे वेगळेपण असून दाखल कर्जप्रकरणे प्रलंबित न राहता त्वरीत निकाली काढले जातील याची दक्षाता घेतली जाईल, शेतकऱ्यांच्या मालाला बऱ्याच वेळेस भाव नसतो, अशा वेळी भाव येई पर्यंत गोडाऊनमध्ये ठेवलेल्या कडधान्य व तृणधान्य मालाच्या तारणावर बँक कर्ज देणार आहे. कर्ज घ्या त्याचा योग्य उपयोग करा नियमित परफेड करा व आपली पत जपा असे राजेश टोपे यांनी सभादांना आवाहन केले.यासोबतच यशवंत सहकारी सुतगिरणीची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व यशवंत सहकारी जिनिंग प्रेसिंगची २७ वी वार्षीक सर्वसाधारण सभा पार पडली. यावेळी उत्तममामा पवार, डॉ.बी.आर.गायकवाड, सतिश टोपे, भागवतराव कटारे, मनोज मरकड, सतिष होंडे, संजय कनके, कैलास जिगे, रजियोद्दीन पटेल, सुर्यकांत आर्दड, भास्कर गाढवे, बाळासाहेब पांढरे, ज्ञानदेव सुबुगडे, कल्याण सपाटे, अरुणराव कळकटे, ॲड़. संजय काळबांडे, विष्णु शेळके, परमेश्वर वाघुंडे, संजय दाड, विजय कनुजे यांच्यासह सर्व सन्माननीय संचालक मंडळ, सभासद, मान्यवर, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# महावितरणच्या मनमानी कारभाराची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन

जालना । प्रतिनिधी

अंबड महावितरण कार्यालयातील मनमानी कारभाराविरोधात अखिल भारतीय ग्राहक पंचायत जिल्हाध्यक्ष व ग्राहक संरक्षण परिषद जालनाचे अशासकीय सदस्य डॉ.रमेश गणपतराव तारगे यांनी तक्रार दाखल केली होती. तसेच दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी अधिक्षक अभियंता महावितरण कार्यालय, जालना येथे आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला होता.

आलेल्या तक्रारीनुसार चौकशी करण्यासाठी एका समितीची स्थापना करण्यात आली आहे. आता ही समिती चौकशी करून आपला अहवाल सादर करणार आहे.

तक्रारीनुसार अंबड महावितरण विभागात वीज कनेक्शनसाठी आर्थिक व्यवहार, चुकीची व अतिरिक्त बिले, ग्राहकांना बिल दुरुस्तीसाठी वेठीस धरणे, तसेच सौर व रोहित्र प्रकरणांमध्ये अनियमितता झाल्याचे गंभीर आरोप आहेत. या तक्रारीची दखल घेत महावितरण मंडळ कार्यालय जालना यांनी चौकशी समिती गठीत केली आहे. समितीत उपव्यवस्थापक (मासं) योगेश शनफड जाधव अध्यक्ष, उपव्यवस्थापक (लेखा) रामनाथ एकनाथ सदस्य व उपव्यवस्थापक (वियले) विशाल राजेंद्रकुमार कासलीवाल सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत. समितीला सात दिवसांच्या आत सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महावितरणकडून डॉ. रमेश तारगे यांना कळविण्यात आले आहे की, तक्रारीची चौकशी सुरू असून बदलीसाठीचा प्रस्ताव छत्रपती संभाजीनगर परिमंडळ कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे. तसेच चौकशीदरम्यान उपलब्ध पुरावे समितीसमोर सादर करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. त्यामुळे महावितरणने विनंती केली आहे की, १७ सप्टेंबर रोजीचे आमरण उपोषण स्थगित करून प्रशासनास सहकार्य करावे.

# बेल्हे येथे तुळजाभवानी माता पलंगाचे जंगी स्वागत

आळेफाटा । प्रतिनिधी

आळेफाटा पारंपरिक ढोल-ताशांचा कडकडाट, सनईचे मंगलसूर, तोफांची सलामी, फटाक्यांची आतषबाजी, फुलांच्या पाकळयांचा वर्षाव आणि रांगोळीच्या पायघड्या अशा अभूतपूर्व मंगलमय वातावरणात बेल्हेकरांनी आज (शनिवारी) तुळजाभवानी मातेच्या पलंगाचे जंगी स्वागत केले. श्रद्धा, उत्साह आणि आनंदाने ओथंबलेल्या या सोहळ्याला तोबा गर्दी उसळली होती. दरवर्षीप्रमाणे यंदाही घोडेगावहून श्रीक्षेत्र तुळजापूरला प्रस्थान ठेवलेल्या आई तुळजाभवानी मातेच्या पलंगाचे बेल्हे येथे भव्य स्वागत करण्यात आले.




बसस्थानक परिसर फुलांच्या सजावटीने नटला होता. ग्रामस्थ, महिला, लहान मुले व मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या स्वागत सोहळ्याने वातावरण दुमदुमून गेले. या प्रसंगी माजी संचालक नानासाहेब भुजबळ,शंकर शिंदे, पांडुरंग संगमनेरकर, केंदूरचे माजी सरपंच वंदना राजेंद्र ताठे, शिवाजी डुबरे, गोविंद बांगर, विजय सोनवणे, संतोष शिंदे, स्वप्निल हिरवे, प्रकाश भालेराव, विशाल बांगर, मच्छिंद्र लामखडे आदी मान्यवरांसह शेकडो ग्रामस्थ उपस्थित होते. भाविकांच्या करमणुकीसाठी वाघ्या-मुरळींच्या संघात सामना रंगला. बसस्थानकासमोर सामुदायिक महाआरतीनंतर सवाद्य मिरवणुकीत पलंगाची गावातून वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली. चौकाचौकात ग्रामस्थांनी फुलांची उधळण करून दर्शनाचा आनंद घेतला. यानंतर हा पलंग गावालगत अंबिका माता मंदिर सभागृहात विसावला. येथे पाबळे परिवाराने भक्तांसाठी मिष्टान्न प्रसादाची व्यवस्था केली होती. दुपारच्या विश्रांतीनंतर बोऱ्हाडे कुटुंबातील सदस्यांनी परंपरेनुसार हा पलंग पुढील मुक्कामासाठी अळकुटीकडे रवाना केला.

# अहमदपूरात ११८ टक्के पाऊस, ५२ हजार हेक्टर पिकांचे नुकसान

## आतापर्यंत ८८४ मिमी पावसाची नोंद, शेतकरी हवालदिल

अहमदपूर । प्रतिनिधी

अहमदपूर तालुक्यात सरासरी पाऊस ७४७ मिमी आहे. पण या वर्षी आतापर्यंत ८८४ मिमी पाऊस झाला आहे. सरासरीपेक्षा ११८ टक्के पाऊस झाला आहे. तालुक्यात झालेल्या पावसाने ५२ हजार हेक्टर क्षेत्राला फटका बसला आहे. प्रशासनाने पंचनामे सुरू केले आहेत. दरम्यान पुन्हा पावसाने डोकेवर काढल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.शनिवारीही पावसाने हजेरी लावली. गेल्या २४ तासात तालुक्यात ३८ मिमी पाऊस झाला आहे. अहमदपूर विभागात ४० मिमी, अंधोरीत २९ मिमी, शिरूरमध्ये ३९ मिमी, किनगावात १२ मिमी आणि हडोळतीमध्ये ५२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. यामुळे आधीच्या नुकसानीत आणखी भर पडली आहे. मागील काळा झालेल्या अतिवृष्टीमुळे



तालुक्यातील जवळपास ५२ हजार हेक्टर क्षेत्राला पावसाने मोठा फटका बसला असून, अनेक ठिकाणी जमीन खरडून गेल्या आहेत. यामुळे खरिपाचे पीक तर हातातून गेलेच, पण आता रब्बीसाठी जमीन कशी तयार करायची, हा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे.

अतिवृष्टीनंतर तातडीने पंचनामे करण्याचे कामे सुरू आहे.अनेक ठिकाणी पंचनामे पूर्ण झाले आहेत, सततच्या पावसामुळे प्रशासकीय कामातही अडथळे येत आहत. शासकीय मदतीसाठी शेतकऱ्यांना ई पिक पाहणी करणे गरजेचे आहे. मात्र गेल्या काही दिवसात अनेक वेळा सर्वर डाऊन होत असल्यामुळे ई पीक पाहणीला अडचण निर्माण झाली होती. मात्र ई-पीक पाहणीसाठी शेतकऱ्यांना २० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ मिळाली असल्याने शेतकऱ्यांना थोडासा दिलासा मिळाला आहे. तालुक्यातील नद्या, नाले आणि तलाव भरलेले आहेत त्यामुळे जमिनीला आता पाणी सहन होत नाही.. या गंभीर परिस्थितीत, त्यामुळे शेतकऱ्यांना शासनाकडून चांगली मदत मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तूर, उडीद, मूगला सर्वाधिक फटका या पावसामुळे तूर, उडीद आणि मूग या पिकांना सर्वाधिक फटका बसला आहे. शेतात उभी असलेली तुरीची पिके जागेवरच वाळून जात आहेत. काढणीला आलेल्या उडीद आणि मुगाची पिके पूर्णपणे खराब झाली असून, मुगाच्या शेंगा जागेवरच सडून गेल्या आहेत. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, ''शेतकऱ्यांच्या व्यथा आता शब्दातही मांडता येत नाहीत, आणि यातून सुटकाही होत नाही.'' नदीकाठचे शिवार पूर्णपणे वाहून गेले असून, रस्त्यावरून येणाऱ्या पाण्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतीत पाणी शिरले आहे.

# शहरात दोन दिवसांमध्ये ३०६ विद्यार्थी खेळणार बुद्धीबळ स्पर्धा

अहिल्यानगर । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने आयोजित श्री साई करंडक बुद्धीबळ स्पर्धेत शहरासह जिल्हाभरातील ३०६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या दोन दिवसीय स्पर्धांना शनिवारी सुरूवात झाली. वयोगटानुसार एक ते ती क्रमांक पटकावणाऱ्या खेळाडुंना रोक पारितोषिक देऊन गौरवण्यात येणार आहे.शनिवारी या स्पर्धेचे उद्घाटन मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते झाले. जिल्हा क्रीडाधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, विन्सेट फिलिप्स , बुद्धिबळ संघटनेचे सचिव यशवंत बापट, महर्षी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अशोक कानडे, उपाध्यक्ष नंदकुमार भावसार, विद्यालयाच्या प्राचार्या तनुजा लोंढे आदी उपस्थित होते.



१४ वर्षे वयोगटात ८५ मुले व ४५ मुलींनी सहभाग घेतला. १७ वर्षे वयोगटात १०८ मुले व ३१ मुलीनी भाग घेतला. तर १९ वर्षे वयोगटात २४ मुले व १३ मुलीनी भाग घेतला.आयुक्त यशवंत डांगे म्हणाले, राज्य व देशपातळीवर विद्यालयातील खेळाडुंनी ठसा उमटवला आहे. सूमैय्या शेख ( फुटबॉल ) श्रावणी भगत ( पिस्तूल शूटिंग ) निकिता रामावत ( फुटबॉल )अमर शेख (फुटबॉल ) व तनिशा शिरसुल ( फुटबॉल ) या खेळाडूंनी श्री साई स्कूल चे नावलौकिक वाढवला.

# माजलगाव धरणाचे १० गेट उघडले : सिंदफना नदीपात्रात ३१,३२५ क्युसेकने विसर्ग

## पैठणच्या नाथसागर धरणाचे २७ गेट उघडले ; गोदावरी नदीपात्रात १ लाख १३ हाजार क्युसेक विसर्ग

माजलगाव । प्रतिनिधी

जायकवाडी धरणाचे २७ दरवाजे उघडुन गोदावरी नदीपात्रात १ लाख १३ हाजार १८४ क्युसेक पाण्याचा विसर्ग सोडण्यात आला आहे ,तर माजलगांव धरणातूत द्वार क्रमांक ११,६,१६,१०, ९,१३,८,१२,१४ व १५ हे १० दरवाजे ०.८० मिटरने उघडण्यात आले आहे.यामधून सिंदफणा नदीपात्रात ३१३३५.३५ क्युसेसने इतके पाणी सोडण्यात आले.त्यामुळे नाथसागर व माजलगाव धरणातुन गोदावरी नदीपात्रात एकुण १ लाख ४४ हाजार क्युसेक वेगाने विसर्ग सोडण्यात आल्याने माजलगाव तालुक्यातील ३२ गावांना पुर परीस्थीतीचा धोका निर्माण झाल्याने गोदावरी आणि सिंदफणा नदी काठच्या गावांना प्रशासनाच्या वतीने सतर्कतेचा व अतिदक्षतेचा इशारा देण्यात आला आहे.



यासंदर्भात प्रशासनाच्या वतीने माजलगाव तालुक्यातील ३२ गावातील सर्व मंडळधिकारी,तलाठी, ग्रामसेवक व पोलीस पाटील यांना गोदाकाठच्या लोकांना सर्तर्क राहण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.सध्या पावसाळा कालावधीत जायकवाडी धरणाचा पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी होत आहे.त्यामुळे पाणलोट क्षेत्रात नदी-नाल्यामधुन जायकवाडी धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत आहे. परिणामी धरणातील पाण्याच्या पातळीत वाढ होत असून,दि १४ सप्टेंबर रविवार रोजी सकाळी ६:०० वाजता जायकवाडी धरणात जलसाठा ९९.९५% इतका झालेला आहे. तसेच दिनांक २९ ऑगस्ट रोजी वेळ सकाळी १०:०० वाजता माजलगांव धरण भरलेले असून धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील चालु आवक लक्षता घेता धरणाच्या जलप्रचलन आराखड्यानुसार जलपातळीचे नियमन करणे आवश्यक असल्यामुळे जायकवाडी धरणातून गोदावरी नदीपात्रात व माजलगांव धरणातून पाणी सोडण्यात आले असून कोणत्याही क्षणी नाथ सागर धरणातुन गोदावरी नदीपात्रात २७ गेट द्वारे१ लाख १३ बाजार १८४ क्यूसेक्स इतका पाणी विसर्ग वाढवण्यात येणार आहे असून माजलगाव धरणातुन द्वार क्रमांक ११,६,१६,१०, ९,१३,८,१२,१४ व १५ हे १० दरवाजे ०.८० मिटरने उघडण्यात आले आहे.यामधून सिंदफणा नदीपात्रात ३१ हाजार ३३५.३५ क्युसेसने इतके पाणी सोडण्यात आले त्यामुळे माजलगाव तालुक्यातील गोदावरी नदीपात्रात नाथसागर व माजलगाव धरणातुन एकुण १ लाख ४४ हाजार क्युसेक वेगाने पाणी सोडण्यात आले असुन माजलगांव तालुक्यातील ३२ गावांत पुरस्थिती उद्भवू शकते त्याअनुषंगाने माजलगांव तालुक्यातील सर्व गोदावरी/सिंदफणा नदीकाठच्या गावातील लोकांना प्रशासनाच्या वतीने अतिदक्षतेचा इशाराही देण्यात आला आहे.

> “ यासंदर्भात माजलगाव तालुक्यातील गोदावरी व सिंदफाना नदीकाठच्या गावातील मंडळधिकारी,तलाठी, ग्रामसेवक व पोलीस पाटील यांनी याबाबत सर्व गावांना अतिदक्षतेचा इशारा देवून याबाबत गावस्तरावरील आपत्ती व्यवस्थापन समितीमार्फत आवश्यक ती पूर्वतयारी करावी सदर प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची हयगय केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधिताविरुध्द जबाबदारी निश्चित करुन आपत्ती व्यवस्थापन कायद्यातर्गत कारवाई करण्यात येईल
>
> -संतोष रुईकर, तहसीलदार

### माजलगाव तालुक्यातील या ३२ गावांना पुराचा फटका

तालुक्यातील खतगव्हाण, पिंपरीखुर्द, मोगरा, शु. लिमगांव, सोन्नाथडी, गुंजथडी, सुरुमगांव, गंगामसला, आडोळा स.पिंपळगाव, आवेगांव, मंजरथ, आळसेवाडी, छत्रबोरगांव, सादोळा, पुरुषोत्तमपुरी, महातपुरी काळेगांवचडी, हिवरा.यु. कवडगांवथडी, डुब्याथडी, गव्हाणचडी, शेलगांववडी, रिधोरी, माजलगांव, मनुर, लखेगांव, गोविंदपुर, देपेगांव, सांडस चिचोली, नागडगांव, रोषणपुरी,या ३२ गावांना पुराचा फटका बसणार आहे.



आष्टी : शहरातील प्रत्येक प्रभागांमध्ये जीर्ण झालेल्या बांधकामामुळे आजूबाजूला राहणाऱ्या नागरिकांना प्रचंड त्रास होत आहे.या पडेल बांधकामांमध्ये काही लोक कचरा टाकत आहेत तर या ठिकाणी मोठमोठी साप निघत असल्याने अनेकांच्या जीवाला देखील धोका आहे. या गोष्टीचा विचार करून आष्टी नगरपंचायतने संबंधित बांधकाम मालकांना नोटीसद्वारे कळवावे अशी मागणी करण्यात येत आहे. एक तर जुने झालेले बांधकामे नव्याने बांधा,नसता पडलेली घरे पूर्ण साफसफाई करून कंपाउंड करा असे आष्टी नगरपंचायतकडून आदेशित करून शहरात राहणाऱ्या नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी जनतेतून होत आहे (छाया : शरद रेडेकर आष्टी)

# ढाळेवाडीच्या बाजीराव सकुडे यांना १ लाखांची आर्थिक मदत

## विकास साळवे, सुशिल ढोले यांच्या पाठपुराव्यामुळे आ.सुरेश धसांनी केली मदत

आष्टी । प्रतिनिधी

मा.मुखमत्री देवेंद्रजी फडणीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यांतील नागरिकांना आरोग्या पुर्ण लाभवे यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून गरीब गरजू रुणाला साठी आ.सुरेश आणा धस यांनी आपल्या निवासस्थानी शेजारी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष स्थापन करुन करण्यात आला आहे यामुळे आष्टी मतदारसंघातील लोकांसाठी त्यांच्यासाठी योजनेच्या माध्यमातून मोठ्या होतं आहे या कक्षाचे मार्फत मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून.पुणे येथे व्हेंटिलेटर बेड अश्यावता असेल तर सोय केली जाईल. धर्मदाय रुणालयात सोय केली जाईल.व पुणे नगर पेशंटचं हॉस्पिटल बील कमी केले जाईल आजकाल धकधक काळात आयुष्य मधे अनेकदा आरोग्य पूर्ण जिव जगताना अनेक अडचणी येतात निर्माण होत असतात असेच पाटोदा



तालुक्यातील ढाळेवाडी येथील ऊसतोडणी मजूर बाजीराव प्रभाकर सकुडे वय २७ यांना बोल रिप्लेसमेंट यांना हॉस्पिटलमध्ये ऍडमिट केले होते उपचारासाठी जास्त पैसे गरज होती घराची परिस्थिती हालखची आहे अचानक मोठं खर्च अशक्य नसल्याने हुले बापु यांनी आ.सुरेश आणा धस संपर्क साधून रुणा हकिकत सांगितली लगेचच आ.सुरेश आणा धस यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कामं पाहणारे त्यांचे सहायक विकास तात्या साळवे यांना बोलावून ह्या पेशंटची कागदपत्रे मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता दाखल करुन घ्या आणि विकास तात्या साळवे व सुशिल ढोले यांनी सतत पाठपुरावा करून कागदपत्र जुळवाजुळव करून पाठपुरावा केला आणि आ.सुरेश आणा धस तत्परता दाखवत सकुडे कुटुंबाला वैद्यकीय उपचारासाठी एक लाख रुपये मंजूर रुपयांची आर्थिक मदत मिळुन दिली संकटाचा काळात मदतीला धावून आल्याने आ सुरेश आण्णा धस रुग्णांच्या नातेवाईकांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहे

# बीड जिल्ह्यात महिला सन्मान फक्त कागदावरच का?

## जिल्हाधिकारी व आमदारांच्या बैठकीत महिलाचे पदे पुरुषांच्या ताब्यात, सावता सेना महिला आघाडीच्या वतीने जाहीर निषेध

पाटोदा । प्रतिनिधी

महिलांसाठी आरक्षण म्हणजे सन्मान, सहभाग आणि नेतृत्वाची खरी संधी. मात्र बीड जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघाच्या विविध विकास कामाच्या बैठकीतच या आरक्षणाचा थेट अपमान झाल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. आष्टी नगराध्यक्षा यांच्या जागी त्यांचा मुलगा, तर पाटोदा व शिरुर नगराध्यक्षांच्या जागी पत्नीऐवजी थेट पती बैठकीत विराजमान झाले. महिला प्रतिनिधींच्या नावावर खुर्ची जिंकूनही प्रत्यक्षात पुरुषच कारभार हाकत असल्याचे हे ज्वलंत उदाहरण आहे. हा प्रकार नेमका लोकशाहीचा अपमान नाही तर काय? असा प्रश्न सावता सेना महिला आघाडीने उपस्थित केला आहे.सावता सेना महिला आघाडीच्या बीड जिल्हाध्यक्षा स्वाती कातखडे व सावता सेना महिला आघाडी आष्टी तालुका अध्यक्षा वर्षा शिंदे यांनी या प्रकारावर तिखट शब्दांत हल्लाबोल केला. महिला आरक्षणाची जागा मिळते तेव्हा आनंदाने टाळ्या वाजवतात, पण कारभार मात्र पुरुषांच्या हाती सोपवला जातो. मग महिला राजकारणात केवळ नावापुरत्या का? महिलांना खुर्ची केवळ 'आरक्षणाची सोय' म्हणून देण्यात येते, खरी सत्ता मात्र घरातील पुरुषांना देण्याचा हा प्रकार महिलांच्या सन्मानाचा उघड उघड अपमान आहे, असे कडाडून मत त्यांनी व्यक्त केले.त्या पुढे म्हणाल्या, जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही बैठक झाली. आमदार,अधिकारी आणि कर्मचारी सगळ्यांच्या डोळ्यांसमोर महिलांच्या जागी पुरुष बसलेले असताना कुणी आवाज का उठवला नाही? याचा अर्थ सत्ताधाऱ्यांच्या गप्प राहण्याला मूक संमती म्हणायचं का? व बीड जिल्हात महिला राज केवळ कागदावरच का?

महिला

◀◀ पान २ वर

# तहसीलदार यांच्या निकालाने बीडमधील भूमाफियांचे धाबे दणाणले

बीड । प्रतिनिधी

जाधव व कुरुळे यांनी बोगस कुळाचे प्रमाणपत्र हस्तगत करून मौजे तळेगाव येथील सर्वे नंबर १९ चे गट क्र. १५ ते २३ क्षेत्र १९ एकर २२ गुंठे व सर्वे क्र. २० चे गट क्र. २४ ते २९ मधील क्षेत्र २१ एकर ४ गुंठे जमीन स्वतःचे नावे हस्तांतरित करून घेतलेली होती, मयत गुलाबी किशन प्रसाद यांची नात अंजुम यांनी कुळाचे प्रमाणपत्र बोगस असल्याने व सदर वादग्रस्त जमीन वर्ग २ ची असताना वर्ग १ म्हणून बोगस नोंद सातबारा वरती करून घेतल्याने मा. तहसीलदार बीड यांचे कोर्टात प्रकरण क्रमांक २०२५/कुळ/कावी - ४०१२ दाखल केले, मा. तहसीलदार यांनी दोन्ही बाजूचे पक्षकारांनी दाखल केलेल्या सर्व कागदपत्राची पडताळणी करून दोन्ही बाजूंचे वकिलांचा युक्तिवाद होऊन प्रकरण निकालासाठी राखीव ठेवण्यात आले, व दिनांक ४/ ९/ २०२५ रोजी न्यायनिर्णय जाहीर करून सदर वादग्रस्त जमीनि वरील जाधव व कुरुळे व व प्लॉट धारकांचे सातबारा वरील नोंदी कमी करून मयत गुलाबबी किशन प्रसाद यांचे नावाची नोंद घेण्याबाबत मंडळ अधिकारी व तलाठी यांना आदेश पारित केले, खऱ्या अर्थाने मयत गुलाबी किशन प्रसाद यांची नातं शेख अंजुम यांना तब्बल ७० वर्षानंतर न्याय मिळाला आहे, या वादग्रस्त जमिनीपैकी १२ एकर जमीन वरद बिल्डर्स अँड डेव्हलपर्स बीड यांनी जाधव व कुरुळे यांचे साहाय्याने प्रकरणाची खरी माहिती असताना सुद्धा १८२ लोकांना प्लॉट विक्री केलेले आहेत. या प्रकरणात अर्जदाराचे वतीने एडवोकेट सचिन एस. जायभाये यांनी भक्कम पुराव्यानिशी बाजू मांडली, अर्जदाराचा बचाव,कागदोपत्री पुरावा व युक्तिवाद ग्राह्य धरून तहसीलदार यांनी अर्जदारचा अर्ज मंजूर केला, या निकालाने बीड जिल्ह्यातील भूमाफिया यांचे धाबे दणाणले आहेत.

# शिवसेनाच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठविल्या बांगड्या -गणेश वरेकर

बीड । प्रतिनिधी

पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार आज माझा देश माझ कूंकू या अभियानाअंतर्गत शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली व माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर, ,महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका प्रमिलाताई माळी, जिल्हा संघटक ज्ञानेश्वर महाराज जाधव तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन , युवा सेना बीड तालुका युवा अधिकारी बारिकराव येवले,यांच्या प्रमुख उपस्थितीत



संपन्न झाले यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांनी सांगितले की पहलगाम हल्यात आमच्या माता भगिनी चे कुंकू पुसले व त्या विधवा झाल्या त्या मारेकऱ्यांना काय शिक्षा झाली ते सरकारने सांगावे ,एवढं होऊनही हे सरकार भारत पाकिस्तान क्रिकेट खेळायला परवानगी देत आहे याचा आम्ही धिक्कार करतो.असेच जर यापुढेही या भाजप सरकारने हूकुमशाही चालवत ठेवली तर नेपाळची पुनरावृत्ती

◀◀ पान २ वर

# सुनीलभाऊ साळवे यांच्या कुटुंबावर प्राणघातक हल्ला

पाटोदा । प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) जिल्हाध्यक्ष सुनीलभाऊ साळवे यांच्या कुटुंबावर नान्नज (ता. जामखेड) येथे झालेल्या प्राणघातक हल्ल्याने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. समाज बांधवांमध्ये भीषण संताप पसरला असून, हल्लेखोरांना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा व्हावी, यासाठी सर्वपक्षीय पातळीवर तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात

### पाटोदा तहसीलवर सोमवारी सर्वपक्षीय निदर्शने

आला आहे.या निषेधार्थ पाटोदा तहसील कार्यालयावर सोमवारी दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी अकरा वाजता भव्य सर्वपक्षीय निदर्शने होणार आहेत. ग्रामीण तसेच शहरी भागातील समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून न्यायाच्या लढ्यात खांदा द्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पद्मश्री डॉ. रत्नाप्पाण्णा कुंभार यांच्या जयंतीनिमित्त लोकरत्न पुरस्काराचे वितरण

## बीड जिल्हा कुंभार समाजाच्या वतीने उपस्थित राहण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

देशभक्त, पद्मश्री डॉ. रत्नप्पा कुंभार यांच्या ११६ व्या जयंती महोत्सव निमित्त १५ जणांचा लोकरत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. हा पुरस्कार सोहळा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगनराव भुजबळ, वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर, अखिल भारतीय प्रजापती महासंघाचे आर.बी.के. प्रजापती, कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र



सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सतिष दादा दरेकर यांच्या उपस्थितीमध्ये मुंबई येथे होणार आहे. या जयंती महोत्सवाला उपस्थित रहावे असे आवाहन बीड जिल्हा कुंभार समाजाच्या वतीने करण्यात आला आहे.

कार्यक्रमाची माहिती देताना समितीचे अध्यक्ष महेश सायकर म्हणाले की, स्वातंत्र्यसैनिक पद्मश्री डॉ. रत्नप्पा कुंभार यांचा ११६ वा जयंती महोत्सव १५ सप्टेंबर रोजी दादर-माटुंगा सांस्कृतिक केंद्र, माटुंगा (पश्चिम) मुंबई येथे समन्वय समितीच्या माध्यमातून आयोजित करण्यात

◀◀ पान २ वर

# जिल्ह्यातील उर्वरित शेतकऱ्यांना सौर ऊर्जा तात्काळ उपलब्ध करून द्या -अनिल बोर्डे

**गेवराई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सौर ऊर्जा योजनेचा लाभ मिळावा यासाठी जिल्ह्यातील शेतकरी ग्राहकाने मागेल त्याला सौर ऊर्जा फॉर्म भरण्यात आले होते . त्यानंतर जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना सौर ऊर्जाचा तात्काळ लाभ मिळावा यासाठी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांनी शासनाकडे वारंवार मागणी करून पाठपुरावा करणे चालू ठेवले होते.



त्यानंतर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पैसे भरण्याचे संदेश प्राप्त झाले होते. त्यानंतर पैसे भरल्यानंतर जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना सौर ऊर्जा योजनाचा लाभ मिळाला आहे.

बीड जिल्ह्यातील राहिलेल्या उर्वरित शेतकरी वर्गाने पैशाचा भरणा केला आहे त्यांना देखील सौर ऊर्जाचा लाभ मिळाला नाही त्यांना तात्काळ लाभ मिळणे आवश्यक आहे . त्या शेतकऱ्याचे देखील आर्थिक नुकसान होत आहे. तरी पैसे भरणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना तात्काळ सौर ऊर्जा योजनेचा लाभ मिळावा अशी मागणी पुन्हा बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी मा. देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन व कार्यकारी अभियंता महावितरण विभाग बीड यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे.

◀◀ पान २ वर

# बंजारा महामोर्चाची तयारी पूर्ण ;हक्काच्या मागणीसाठी समाज रस्त्यावर

## बंजारा कृती समितीने पत्रकार परिषदेतून दिली माहिती

**बीड । प्रतिनिधी**

हैदराबाद गॅझेटनुसार बंजारा समाज अनुसूचित जमाती प्रवर्गात असून महाराष्ट्रातील बंजारा बांधवांना एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे या मागणीसाठी बीड जिल्हा भव्य महा मोर्चा सोमवारी ता.१५ सप्टेंबर रोजी सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार असल्याची माहिती बीड जिल्हा बंजारा समाज कृती समितीच्या वतीने पत्रकार परिषदेतून सांगण्यात आले.



गावापासून कोसोदूर राहत वाडी, वस्ती आणि डोंगराळ भागात तांड्यावर वास्तव करणारा हा समाज आजही विकासापासून अनेक मैल दूर आहे. आजही जिल्ह्यातील अनेक तांड्या रस्ता नाही, अनेक तांड्या भोवतीक सोयी सुविधा नाहीत. तरी या समाज आज आपल्या हक्काच्या आणि मूलभूत मागणीसाठी रस्त्यावर येत आहे. तांड्यावरी अनेक महिला भगिनी आपल्या लेकरांच्या भविष्यासाठी लढाईत उतरत आहेत. जिल्ह्यातील बंजारा बांधव बहुसंख्येने मोर्चा साठी बीडमध्ये दाखल होणार असल्याचे कृती समितीकडून पत्रकार परिषद घेऊन सांगण्यात आले.

◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# भारतातील पहिल्या ग्रीन मिथेनॉल बंकरिंग आणि रिफ्युअलिंग केंद्राची पायाभरणी

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील सोपान ग्रूपतर्फे व्हीओसी पोर्ट थॉरिटी (व्हीओसीपीए) च्या सहकार्याने भारतातील पहिल्या ग्रीन मिथेनॉल बंकरिंग आणि रिफ्युअलिंग केंद्राचे भुमिपूजन केले आहे. यामुळे देशात प्रथमच शाश्वत मॅरिटाईम सुविधांच्या निर्मितीमध्ये आणखी एक प्रगतीशील पाऊल टाकले आहे.



या महत्त्वपूर्ण सुविधेचे उद्घाटन केंद्रीय मंत्री सर्बानंदा सोनोवाल यांच्या हस्ते बंदर, जहाज बांधणी आणि जलमार्ग मंत्रालायाच्या अंतर्गत करण्यात आले असून यामुळे भारतातील बंदरांचे डी कार्बनायझेशन करण्याच्या दिशेने टाकण्यात आलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे, या केंद्रामुळे आता देशाने स्वच्छ उर्जेच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. हे ग्रीन मिथेनॉल केंद्र हे भारताच्या नेट झिरो एमिशन्स च्या वचनबध्दतेसह मॅरिटाईम इंडिया २०३० च्या उद्दिष्ट्यांशी सुसंगत असून यांतून भारताच्या स्वच्छ इंधन आणि बंदरांचा शाश्वत विकास करण्यास चालना मिळेल.

बंदर, जहाज बांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाचे केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्या हस्ते पूर्वाश्रमीच्या तुतिकोरीन पोर्ट ट्रस्ट असलेल्या व्ही ओ चिदंबरनार पोर्ट थोरिटी च्या ग्रीन मिथेनॉल वर आधारीत डिकार्बनायझेशनच्या प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आलेल्या प्रकल्पाचे ५ सप्टेंबर २०२५ रोजी भुमिपूजन करण्यात आले. या प्रकल्पा अंतर्गत ७५० घन मीटर ग्रीन मिथेनॉलचे बंकरिंग आणि शिप रिफ्युअलिंग टर्मिनलची बांधणी करण्यात येणार आहे.

व्हीओसीपीए चे अध्यक्ष श्री सुसांता पुरोहित यांनी सांगितले भारत सरकारने २०७० पर्यंत नेट झिरोचे लक्ष्य ठेवले आहे. या दृष्टिकोनाच्या माध्यमातून व्हीओसी पोर्ट ने ग्रीन पोर्ट मिशनच्या दिशेने एक उत्तम पाऊल टाकले आहे आणि यशस्वीपणे ग्रीन हायड्रोजन प्रकल्प पूर्ण केला आहे. शाश्वत विकास करण्याच्या आणि जागतिक स्तरानुसार काम करण्याच्या योजने अंतर्गत व्हीओसीपीए तर्फे भारतातील पहिल्या ग्रीन मिथेनॉल बंकरिंग आणि रिफ्युअलिंग केंद्राची स्थापना केली आहे. व्हीओसीपीए ला भारतातील सोपान ग्रुप या ग्रीन एनर्जी इकोसिस्टम आणि ईपीसी प्रकल्पातील अनुभवी तज्ञांबरोबर सहकार्य करतांना आंम्हाला आनंद होत आहे.सोपान चे संचालक श्री अनिरुध्द कडवेकर यांनी सांगितले आजघडीला सोपान केवळ केंद्रांची निर्मिती करत नाही तर आम्ही भारताच्या ग्रीन जहाज बांधणीच्या भविष्याचा पाया घालत आहे. देशातील पहिल्या विशेष अशा ग्रीन मिथेनॉल बंकरिंग हब ची निर्मिती तुतिकोरिन येथे करुन आम्ही ९५ टक्क्यांपर्यंत सीओ२ चे बोटींकडून होणारे उत्सर्जन कमी करुन भारताला पर्यायी इंधन क्षेत्रातील महत्वपूर्ण खेळाडू बनण्यास सहकार्य करत आहोत. या प्रकल्पांच्या शृंखले मुळे भारताच्या मेक इन इंडिया क्षमतांचे द्योतक असून नेट झिरोच्या दिशेने पावले टाकण्यात आली आहेत, ज्यायोगे भारतातील बंदरे ही शाश्वत शिपिंग साठी प्राधान्यक्रमाची बंदरे ठरतील. व्हीओसी पोर्ट थॉरिटी तर्फे आमच्यावर पुन्हा विश्वास दाखवण्यात आले आहे आणि बंदर, जहाजबांधणी तसेच जलमार्ग मंत्रालायाने आमच्यावर विश्वास दाखवल्या बद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

# आयुष कोमकर खूनप्रकरणी आंदेकर टोळीतील चौघांना अटक

## गुजरातमधील द्वारका येथून घेतले ताब्यात, सोमवारी न्यायालयात हजर करणार

पुणे । प्रतिनिधी

आयुष कोमकर खून प्रकरणात फरार असलेल्या आंदेकर टोळीतील आणखी चौघांना गुजरातमधून अटक करण्यात आली. गुन्हे शाखेने शनिवारी सायंकाळी ही कारवाई केली. या प्रकरणात यापूर्वी आठजणांना अटक केली असून, आरोपी कृष्णा ऊर्फ कृष्णराज सूर्यकांत आंदेकर (वय ४०) हा अद्याप फरार आहे.




अतिरिक्त पोलिस आयुक्त पंकज देशमुख यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हे शाखेच्या पथकाने गुजरातमधील द्वारका येथून चार आरोपींना ताब्यात घेतले आहे. शिवम ऊर्फ शुभम उदयकांत आंदेकर (वय ३१), लक्ष्मी उदयकांत आंदेकर (वय ६०), शिवराज उदयकांत आंदेकर (वय २९) आणि अभिषेक उदयकांत आंदेकर (वय २१, सर्व रा. नाना पेठ) अशी त्यांची नावे आहेत. तेथील न्यायालयातून रविवारी ट्रान्झिट रिमांड घेतल्यानंतर त्यांना पुण्यात आणण्यात येईल. त्यानंतर सोमवारी (ता. १५) येथील न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. माजी नगरसेवक वनराज आंदेकर खून प्रकरणातील आरोपी सोमनाथ गायकवाडच्या कुटुंबीयांना आंदेकर टोळीने लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र पोलिसांनी हा कट वेळीच उधळल्याने, आंदेकर टोळीने आरोपी गणेश कोमकरचा मुलगा आयुष कोमकर (वय १९) याचा पाच सप्टेंबरला गोळ्या झाडून खून केला होता.

या प्रकरणात यापूर्वी आंदेकर टोळीप्रमुख सूर्यकांत ऊर्फ बंडू राणोजी आंदेकर, स्वराज निलंजय वाडेकर, वृंदावनी निलंजय वाडेकर, तुषार निलंजय वाडेकर यांना बुलडाणा जिल्ह्यातून अटक केली होती. तर, अमित प्रकाश पाटोळे (वय १९), यश सिद्धेश्वर पाटील, अमन युसूफ पठाण ऊर्फ खान आणि सुजल राहुल मेरगू (सर्व रा. नाना पेठ) यांना पुण्यातून पकडले होते. या प्रकरणातील सर्व १३ आरोपींविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी (मकोका) कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांनी बंडू आंदेकरच्या घर झडतीत ७७ तोळे सोन्याचे दागिने, अडीच लाखांची रोकड असा ७५ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तपास सहाय्यक आयुक्त शंकर खटके करीत आहेत.

# बाणेरमध्ये स्पा सेंटरच्या नावे वेश्याव्यवसाय

## मॅनेजर,मालक, जागामालकासह चौघांवर गुन्हा दाखल

पुणे: बाणेर येथील पॅनकार्ड क्लबरोड परिसरातील स्पा सेंटरच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायावर बाणेर पोलिसांनी कारवाई केली. या वेळी तेथून सात पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे. फॉर्च्युन स्पा सेंटरमध्ये देहविक्रीचा हा प्रकार सुरू होता.

याप्रकरणी महिला पोलिस उपनिरीक्षक शैला पाथरे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, बाणेर पोलिस ठाण्यात स्पा मॅनेजर सुशील त्रिलोक ठाकूर (वय २६, रा. बाणेर, मूळ हिमाचल प्रदेश), दीपक बिजेंद्र सिंह (वय ३१, रा. दिल्ली), स्पा मालक ऋषभ राजेंद्र पाटील (वय ३०, रा. जळगाव), जागामालक जयेश सुनील अतमानी (वय २९, रा. पिंपळे सौदागर) या चौघांविरुद्ध अनैतिक मानवी वाहतूक व्यापार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पॅनकार्ड क्लब रोड, बाणेर येथील क्सिस बँकेच्या वरती असलेल्या ओंकार पॅराडाईज या इमारतीत फॉर्च्युन स्पा सेंटरमध्ये स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती बाणेर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार बनावट ग्राहक पाठवून खात्री केली असता, तेथे वेश्याव्यवसाय सुरू असल्याचे समोर आले.

त्यानुसार बाणेर पोलिसांनी शुक्रवारी (दि. १२) सायंकाळी पावणेसात वाजेच्या सुमारास छापा टाकून, पाच पीडित महिलांची सुटका केली. आरोपी स्पा मॅनेजर ठाकूर आणि सिंह हे दोघे त्या महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेत होते.




नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे आज मुंबई येथे सपत्नीक आगमन झाले. राजभवन येथे पोहोचल्यावर राज्यपाल श्री. देवव्रत यांना मुंबई पोलिसांतर्फे मानवंदना देण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. उद्या दि. १५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता राज्यपाल आचार्य देवव्रत महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची शपथ घेणार आहेत.

# एक गाव, एक विचार! आडाचीवाडीने पाणंद रस्ते खुले करत शेतीतला अडथळा केला दूर

पुणे : पाणंद रस्त्यांवर अतिक्रमण, वाहतुकीच्या अडचणी आणि त्यातून होणारे वाद हे शेतकऱ्यांसमोरील मोठे प्रश्न आहेत. पण पुरंदर तालुक्यातील आडाचीवाडी या गावाने हा प्रश्न कायमस्वरूपी सोडवून महाराष्ट्रासाठी आदर्श निर्माण केला आहे. गावकऱ्यांनी एकत्र येऊन सर्व १५ पाणंद रस्ते खुले केले. सातबाऱ्यावर नोंद करून घेतली, रस्त्यांचे क्रॉकिटीकरण केले आणि दुतर्फा वृक्षलागवडही केली.



शेतकऱ्यांना शेतीमाल शेतातून बाजारात नेण्यासाठी पाणंद रस्ते आवश्यक असतात. मात्र गेल्या काही वर्षांत या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली. त्यामुळे वाहतूक अडचणीत आली, शेतकऱ्यांमध्ये वाद निर्माण झाले आणि महसूल विभागाकडे दावेही वाढले. या पार्श्वभूमीवर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील पाणंद रस्ते खुले करण्याची मोहीम सुरू केली.

या मोहिमेला आडाची वाडी गावाने पहिल्याच टप्प्यात प्रतिसाद दिला. गावकऱ्यांनी ग्रामसभेत ठराव केला. सर्वानुमते १५ रस्ते खुले करण्याचे ठरले. भूमी अभिलेख विभागाने रस्त्यांची मोजणी केली. जिओ-फेनन्सिंग करून नकाशे तयार केले. सर्व रस्त्यांची रुंदी २० फूट करण्यात आली. सर्व्हे नंबरनुसार सातबाऱ्यावर 'ग्रामस्थांची वहिवाट' अशी नोंद घेण्यात आली. रस्त्यांना आप्तस्वकीयांची नावे न देता महापुरुषांची नावे देण्यात आली. आडाची वाडीने एकाच दिवशी १५ पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमण दूर करून, सातबाऱ्यावर नोंद घेतली. त्यामुळे पाणंद रस्ते खुले करण्याची मोहीम पूर्णपणे यशस्वी केली.गावचे भूमिपुत्र व रायगडचे निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी यासाठी पुढाकार घेतला.

शेतीमालाची वाहतूक करणे सोईचे जावे यासाठी रस्त्यांचे सिमेंट क्रॉकिटीकरण देखील करण्यात आले. जेणेकरून भविष्यात या रस्त्यांवर अतिक्रमण होऊ नये आणि कायमस्वरूपी खुले राहावे, हा त्यामागे उद्देश असल्याचे आडाचीवाडीचे सरपंच सुवर्णा पवार आणि उपसरपंच मोहन पवार यांनी सांगितले.'आडाचीवाडी गावाने शेतकऱ्यांच्या सहमतीने पाणंद रस्ते खुले करून नवा आदर्श निर्माण केला आहे. इतर गावांनीही त्यापासून प्रेरणा घ्यावी,' असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.पाणंद रस्त्यांच्या खुले करण्यावर नुसता भर न देता त्या माध्यमातून गावात रोजगार निर्मिती कशी होईल, यांची देखील काळजी घेतली. रस्त्याच्या दुतर्फा नारळ व जांभळाच्या एक हजार झाडांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला आहे. झाडांच्या संगोपनासाठी 'मनरेगा' अंतर्गत बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी २०० झाडामागे एक अशा पाच बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे.


# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा 'अंदाजपत्रकात नागरी सहभाग' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## जास्तीतजास्त अभिप्राय नोंदवण्याचे उपायुक्त अण्णा बोदडे यांचे आवाहन

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड हे देशातील सर्वात वेगाने विकसित होणाऱ्या शहरांपैकी एक असून पिंपरी चिंचवड महापालिका दरवर्षी अर्थसंकल्प तयार करताना नागरिकांचे अभिप्राय व सूचना विचारात घेते. त्या अनुषंगाने आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली 'अंदाजपत्रकात नागरी सहभाग' हा उपक्रम महापालिकेने हाती घेतला असून या उपक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन अर्थसंकल्प २०२६-२७ साठी जास्तीतजास्त अभिप्राय नोंदवावेत, असे आवाहन महापालिका उपायुक्त अण्णा बोदडे यांनी केले आहे.

महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते १५ ऑगस्ट २०२५ रोजी 'अंदाजपत्रकात नागरी सहभाग' या उपक्रमाला सुरुवात झाली. या उपक्रमांतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने निगडी येथील एस. बी. पाटील इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट महाविद्यालयातील सभागृहात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी उपायुक्त अण्णा बोदडे बोलत होते. कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. कीर्ती धारवडकर, शैक्षणिक विभागप्रमुख डॉ. रूपाली कुदरे, सहयोगी प्राध्यापक डॉ. काजल महेश्वरी आदी उपस्थित होत्या.



उपायुक्त अण्णा बोदडे म्हणाले, 'भारत सरकारने केलेल्या सर्वेक्षणात देशभरातील राहण्यायोग्य उत्तम असणाऱ्या शहरांमध्ये आपल्या पिंपरी चिंचवड शहराचा समावेश झाला आहे. शहरातील पायाभूत सुविधा, औद्योगिक उपलब्धता, शैक्षणिक संस्था, वैद्यकीय सुविधा, सार्वजनिक वाहतूक सुविधा शहराच्या प्रगतीला गती देत असतात. केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशभरातून पिंपरी चिंचवड शहरात नागरिक कामानिमित्त येत असतात. त्यातील बहुतांश नागरिकांचा पिंपरी चिंचवड शहरात स्थायिक होण्याकडे कल वाढला असून सध्या शहराची लोकसंख्या ३० लाखांवर पोहोचली आहे. या शहराचा विकास वेगाने होत असून या विकासाला आकार देण्यात नागरिकांना सक्रिय सहभागी होता यावे, यासाठी महापालिकेने 'अंदाजपत्रकात नागरी सहभाग' उपक्रम राबवत आहे. या उपक्रमात जास्तीतजास्त महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी, तरुणांनी सहभागी व्हावे,' असेही उपायुक्त बोदडे म्हणाले.

### विविध उपक्रमांची विद्यार्थ्यांना दिली माहिती

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विविध उपक्रमांची माहिती उपायुक्त बोदडे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिली. ते म्हणाले, 'महापालिकेशी संपर्क साधण्यासाठी 'पीसीएमसी स्मार्ट सारथी' प निर्माण करण्यात आले आहे, ज्यावर महापालिकेच्या सर्व विभागांची माहिती व संपर्क साधण्याची सोय उपलब्ध आहे.' यावेळी उपायुक्त बोदडे यांनी हरित सेतूसह विविध उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच 'अंदाजपत्रकात नागरी सहभाग' या उपक्रमांत सहभागी होऊन अभिप्राय कसा नोंदवावा, याची माहिती देखील दिली.

# विकृतीचा कळस! दुकानासमोर बसलेल्या कुत्र्यावर सपासप १८ वार, मृतदेह फरफटत रस्त्यावर आणला, सीसीटीव्हीत घटना कैद

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी

पुण्यातील पिंपरी चिंचवड शहर हादरवून सोडणारी एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. आकुर्डी येथील डी टू सी कमर्शियल दुकानासमोर बसलेल्या एका सायबेरियन हस्की जातीच्या कुत्र्याला दगडाने व लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करत त्याची एका अज्ञात व्यक्तीने हत्या केल्याची घटना समोर आली आहे. ही घटना मंगळवारी रात्री साडेअकराच्या सुमारास घडली असून दुकानाबाहेरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात संपूर्ण प्रकार कैद झाला आहे.



पिंपरी चिंचवड शहरातील आकुर्डी येथे डी टू सी कमर्शियल दुकानासमोर बसलेल्या कुत्र्याला आरोपीने अचानक लक्ष्य केले. सुरुवातीला त्याने दगडाने वार केले. नंतर लाकडी दांडक्याने एकामागून एक जोरदार प्रहार करून कुत्र्याला गंभीर जखमी केले. एवढ्यावरच न थांबता आरोपीने मृतावस्थेतील कुत्र्याला फरफडत रस्त्यावर आणले. या अमानुष कृत्याचे दृश्य पाहून नागरिक व प्राणीप्रेमी स्तब्ध झाले आहेत.

घटनेनंतर परिसरात संतापाची लाट उसळली आहे. प्राणीप्रेमींनी आरोपीला तात्काळ अटक करण्याची मागणी केली आहे. दुकानाच्या मालकाने तातडीने निगडी पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात भारतीय दंड संहिता कलम ३२५, प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० मधील कलम ११(१) आणि इतर संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.निगडी पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास वेगाने सुरू आहे. आरोपी कोण आहे, त्याचे हेतू काय होते, आणि त्याने असा अमानुष प्रकार का केला, याबाबत अद्याप निश्चित माहिती समोर आलेली नाही. पोलिसांच्या तपासानंतर यामागील कारण स्पष्ट होईल. दरम्यान, सोशल मीडियावर या घटनेचा व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. प्राणीप्रेमी संघटनांनी पोलिस प्रशासनाकडे आरोपीवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

# मंत्री चंद्रकांत पाटलांनी स्वारगेट मेट्रो स्टेशनची केली पाहाणी; व्यक्त केला 'हा' मोठा विश्वास

पुणे । प्रतिनिधी

आगामी काळात स्वारगेट मेट्रो स्थानक हे सर्वसामान्य पुणेकरांना प्रवाशांना प्रवासासोबतच कॉर्पोरेटसाठी मल्टीमॉडेल हब देखील ठरेल, असा विश्वास राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला. पाटील यांनी स्वारगेट मेट्रो स्थानकास भेट देऊन स्थानकाच्या आराखड्याचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, संचालक अतुल गाडगीळ, संचलन व प्रणालीचे संचालक विनोदकुमार अग्रवाल यांच्यासह अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.पाटील म्हणाले की, स्वारगेट बस स्थानक हे पुण्यातील सर्वात व्यस्त बस स्थानक आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून असंख्य नागरिक पुण्यात येण्यासाठी स्वारगेट बसस्थानकाचाच वापर करतात. यापूर्वी स्वारगेटला आलेल्या प्रवाशाला आपल्या इच्छित स्थळी पोहोचण्यासाठी पीएमपीएमएल किंवा खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत होता. मात्र, पुण्यात तयार झालेल्या मेट्रो स्टेशनला आताच उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पाटील पुढे म्हणाले की, स्वारगेट मेट्रो स्थानकाचा आराखडा अतिशय भव्य स्वरूपाचा आहे. हे स्टेशन एका मोठ्या मल्टीमोडल हबमध्ये विकसित केले जात आहे, ज्यामुळे विविध वाहतूक सेवांचे एकत्रीकरण होणार आहे. त्यामुळे आगामी काळात कॉर्पोरेटसाठी देखील प्रमुख आकर्षणाचे केंद्र ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.



# लोकतंत्रच्या बातमीची महावितरण कडून दखल

पिपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड परिसरातील भोसरी धावडे वस्ती या भागातील वीज वितरणाचा खेळ खंडोबा झाली असल्याची बातमी दैनिक राज्य लोकतंत्र ने प्रकाशित केल्यानंतर या वृत्ताची दखल महावितरण कडून घेण्यात आली या भागातील नागरिकांनी लोकतंत्र चे आभार मानले आहेत



भोसरी धावडे वस्ती गणेश नगर येथील दिनांक १० सप्टेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य महावितरण कंपनीच्या भोंगळ कारभाराची बातमी प्रसारित केली होती धावडे वस्ती गणेश नगर येथील नागरिकांच्या समस्या जाणून घेण्याकरिता दैनिक राज्य लोकतंत्र स्थानिक ग्राउंड वर जाऊन प्रत्यक्ष लोकांच्या समस्या जाणून घेतल्या असता तेथील महावितरणचे डीपी ट्रांसफार्मर उघड्यावर असल्याचे निदर्शनास आले हीच बाब लक्षात येता दैनिक राज्य लोकतंत्र्याचे प्रतिनिधी यांनी स्थानिक लोकांच्या समस्या जाणून घेतल्यावर दैनिक राज्य लोकतंत्रणे बातमी प्रसारित केली या बातमीची दखल घेत भोसरी येथील महाराष्ट्र राज्य महावितरण महामंडळ कंपनीला जाग आली व दोन दिवसांमध्ये सर्व डीपी ट्रान्सफर बदलण्यात आले स्थानिक नागरिकांनी फोन करुन व मेसेज च्या माध्यमातून दैनिक राज्य लोकतंत्रचे आभार मानले.

